SEMPERIT

# आचार संहिता



ही आचार संहिता रिको समूहासहित सेम्पेरिट समूहाकरिता लागू आहे.

RICO

आवृत्ती 6 – 2/2024

परिचय 3
ही आचार संहिता आमचे होकायंत्र आहे 4
सेम्पेरिट कोर्पोरेट मुल्ये 5
ही आचारसंहिता माझ्यासाठी आहे का? 6
तुम्ही मार्गदर्शनासाठी कुठे जाऊ शकता (सेम्पेरिटची तक्रार यंत्रणा)? 8
व्यवसायाची अखंडता आणि अनुपालन 9
फेअर प्ले 10
मानवी हक्क 10
सामाजिक आणि कामगार मानके 11
भेदभाव 12
छळ आणि गैरवर्तन 12
मादक पदार्थ आणि दारू 12
जागतिक विविधता आणि समावेश 12
भ्रष्टाचार विरोधी 13
स्वारस्यांचा संघर्ष 14
मनी लॉंड्रिंगला प्रतिबंध 15
अंतर्गत नियम 16
अविश्वास आणि स्पर्धा कायदा 16
निर्यातीवर नियंत्रण आणि मंजुरी 17
फसवणूक 17
अंतर्गत नियंत्रण नियम 18
सार्वजनिक तपास 19
सायबर सुरक्षा, माहिती संरक्षण आणि संवेदनशील माहिती 19
टिकाऊपणा 20
आरोग्य, सुरक्षा, पर्यावरण आणि गुणवत्ता 21
बाह्य संपर्क 22
सोशल मीडिया 22
बोला! 23
अधिक माहिती 24

# परिचय

190 पेक्षा अधिक वर्षांपासून, आम्ही औद्योगिक आणि वैद्यकीय क्षेत्राकरिता विशिष्ट आणि विशेष पॉलिमर उत्पादने विकसित करणे, निर्माण करणे आणि विक्री करणे या क्षेत्रामध्ये क्षमता विकसित केली आहे. आम्ही तांत्रिक विकास आणि नाविन्यपूर्ण प्रगतीसाठी सतत प्रयत्नशील आहोत. प्रत्येक दिवशी आणि व्यवसायाच्या प्रत्येक पैलूंवर आम्ही उच्च मानकाचे पालन करतो आणि त्यामुळेच आपल्या कंपनीचा रचनात्मक कणा मजबूत आणि लवचिक झाला आहे.

सेम्पेरिटची आचार संहिता आपल्याला दैनंदिन व्यवसाय आणि आपल्याला लागू असलेली विशिष्ट मानके आणि आपल्या बाहेरील व्यवसाय भागीदाराकडून असलेल्या अपेक्षांसाठी मार्गदर्शक तत्वे उपलब्ध करून देईल. ही मार्गदर्शक तत्त्वे सेम्पेरिटची धोरणे, कार्यपद्धती आणि मार्गदर्शक तत्त्वांसाठी पाया म्हणून काम करते, जे जागतिक स्तरावर आमच्या व्यवसायासाती काम करत असताना अपेक्षित असलेल्या वर्तनांवर अतिरिक्त मार्गदर्शन प्रदान करतात.

आमचे शब्द, वर्तन आणि कृती अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आम्ही जगात कुठेही असलो, किंवा आमचा व्यवसाय आणि भूमिका कोणतीही असली तरीही आम्ही सचोटीने वागतो. आमच्या सर्व भागीदारांनी सर्व राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करावे आणि आमच्या समान मार्गदर्शक तत्त्वांचे, नैतिकता आणि अनुपालन आधारावर कृती करावी अशी आमची अपेक्षा आहे. ज्यावेळी आम्ही स्वतःटीने वागतो तेव्हा आमचे ग्राहक, पुरवठादार, भागीदार, नियामक मंडळे, व्यवसाय भागीदार आणि सार्वजनिक व इतर भागीदार आमच्यावर दृढनिष्ठा ठेवतात आणि विश्वासाने आम्हाला प्रतिसाद देतात.

आपण या आचार संहिते प्रति वचनबद्ध आहोत, आणि आपण विश्वास ठेवतो की, तुम्ही ज्यावेळी सेम्पेरिट कर्मचारी किंवा व्यवसाय भागीदार असाल, आणि तुम्हाला आपल्या व्यवसायामध्ये कोणत्याही प्रकारचे चुकीचे वर्तन, व्यवसायातील गैरप्रकार कोणत्याही परिस्थितीत स्वीकृत केला जाणार नाही आणि तुम्ही अशा बाबींसाठी बोलाल.

जर तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत या आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास आणि सेम्पेरिटला कोणत्याही प्रकारची जोखीम निर्माण झाल्यास, कृपया सेम्पेरलाईन या आपल्या विसल ब्लोईंग सिस्टीम म्हणजेच आपली तक्रार मांडण्यासाठीच्या यंत्रणे कडे, तुम्ही निनावीपणे तक्रार करू शकता..

आपण अखंडतेसाठी प्रतिबद्ध आहोत. सेम्पेरिटसाठी विविध व्यवसाय कृती करत असतांना, या आचारसंहितेला समजून त्याचे पालन करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. या आचारसंहिते संबंधित कोणतेही प्रश्न असल्यास कृपया सेम्पेरिट अनुपालन विभागाशी किंवा आपल्या व्यवस्थापकाशी संपर्क करा.

तुमच्या सतत समर्थनासाठी आणि योग्य गोष्टी करण्याच्या वचनबद्धता यासाठी धन्यवाद..

**कार्यकारी मंडळ**
सेम्पेरिट एजी होल्डिंग

# ही आचार संहिता आमचे होकायंत्र आहे

## आमच्याकरिता ही आचार संहिता का आहे?

ही आचारसंहिता आपल्याला आपल्या कामाच्या ठिकाणी योग्य वर्तन करण्यासाठी एक मार्गदर्शक होकायंत्र आहे. ही आचारसंहिता आपल्या दैनंदिन कामांमध्ये आपण सर्वोत्तम निवड करावी यासाठी एक प्रमाण बिंदू आहे.

ही आचारसंहिता आपल्याला आपली धोरणे, मार्गदर्शक तत्त्वे आणि सामान्य नैतिक मार्ग यासाठी उच्चस्तरीय मार्गदर्शन करते. ही आचारसंहिता आपण कसे वागावे आणि प्रतिक्रिया कशी द्यावी याबद्दल स्पष्ट मानके आणि अपेक्षा निर्धारित करते.

**P** सचोटीने व्यवसाय करणे ही आमची सामायिक जबाबदारी आहे.

ही आचारसंहिता आमचे सर्व कर्मचारी आणि सेम्पेरिटचे तृतीय पक्ष भागीदारांसाठी तत्वे, मानके आणि नैतिक अपेक्षा प्रस्थापित करते, ही आचार संहिता सर्व कर्मचारी आणि तृतीय पक्ष भागीदार यांनी पालन केली पाहिजे.

ती आचारसंहिता म्हणजे फक्त नियम नाहीत, ती आमच्या मूल्यांचे आणि तत्वांचे वर्णन करते करते, आणि आमचे ध्येय स्पष्ट करते व त्या संदर्भातील सर्व व्यावसायिक वर्तनाशी निगडित असलेल्या सर्व मानकांसोबत जोडते. हे आमच्या सचोटी आणि अनुपालनाच्या चर्चेला प्रोत्साहन देते आणि आम्हाला नैतिक समस्यांना व्यवस्थापित करण्यास सक्षम करते.

ही आचारसंहिता आपल्याला सेम्पेरिटमधील नैतिक बाबी संदर्भात अनुकूल दस्तावेज, सेवा आणि इतर स्त्रोतांना निश्चित करण्यासाठी मदत करते.

ही आचारसंहिता आपल्याला नैतिक निर्णय घेण्यासाठी दृढ आधार प्रदान करते आणि निश्चित दिशा प्राप्त करून देते.

ही आचार संहिता आमच्या निर्णयाची जागा घेत नाही. हे सर्वांवर अवलंबून आहे. सेम्परिटमधील अंतर्गत आणि सर्व बाहय व्यावसायिक वातावरणात लागू होणारे सर्व नियम आणि अटींचे पालन करणे आपल्याला बंधनकारक आहे. आम्ही सचोटीने वागतो, आणि आम्ही आमच्या सर्व व्यवसाय भागीदारांकडून समान नैतिक आणि योग्य वर्तनाची अपेक्षा करतो.

## जबाबदार व्यवसाय आचरणासाठी आमची वचनबद्धता

आम्ही आंतरराष्ट्रीय मानव अधिकार मानके, कामगार स्थिती, पर्यावरण यांचा आदर करतो आणि आम्ही भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी प्रतिबद्ध आहोत.

आंतरराष्ट्रीय अधिवेशने, घोषणा आणि मार्गदर्शक तत्वे आम्हाला नैतिक व्यवसाय चालवण्यात मदत करतात:

- संयुक्त राष्ट्रांची मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा
- आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे मुख्य अधिवेशन
- आधुनिक गुलामगिरी कायदा
- व्यवसाय आणि मानवी हक्कांवरील संयुक्त राष्ट्रांची मार्गदर्शक तत्त्वे
- संयुक्त राष्ट्रांचा ग्लोबल कॉम्पॅक्ट..



# सेम्पेरिट कोर्पोरेट मुल्ये

आमची सेम्पेरिट कॉर्पोरेट मुले ही आमच्या संस्थेचा महत्त्वपूर्ण गाभा आहे. ही मूल्ये आमच्या दैनंदिन कृतीमध्ये अमलात आणली जाते आणि आमचा सेम्पेरिट ब्रँड त्यासाठी प्रतिबद्धता परावर्तित करतो: ज्यामध्ये आमचा नैतिक व्यवसाय आम्ही सर्व काळ अमलात आणतो.




आम्ही कोण आहोत आणि आम्ही कुठून आले आहोत याचा विचार न करता आम्ही एकमेकांना सहकार्य आणि प्रशंसा करतो. आम्ही एकनिष्ठ असून, पारदर्शकतेने व आदरपूर्वक पद्धतीने संवाद साधतो. आमच्या कृतीमधील अस्वस्थपणा आणि चुकांपासून शिकण्याच्या मानसिकतेतून, आम्ही विश्वास निर्माण करतो.




आम्ही आमच्या ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य आणि संशोधनात्मक प्रक्रिया आणि उत्पादने विकसित करतो. आमची मुल्आये जोड्न,आम्ही आज आणि भविष्यासाठी उपाय करण्यासाठी डिझाईन करतो.




आम्ही आमच्या खांद्यावर जबाबदारी घेतो आणि आमच्या कामाशी एकनिष्ठ राहतो. आम्ही आमच्या सामान्य विश्वासासाठी उभे राहतो आणि उच्च परिणामांची अपेक्षा करतो. ध्येया साठी आमची ओढ बदल घडवून आणते.




आम्ही आमच्या ग्राहकांपासून सुरुवात करतो. आणि आमच्या ग्राहकांच्या दृष्टिकोनातून विचार करण्यास सुरुवात करतो. आम्ही काळजीपूर्वक ऐकतो, आणि वचन दिल्यानुसार आमच्या सेवा आणि उत्पादने प्रदान करतो. आम्ही अंतर्गत आणि बाह्य स्तरावर सर्वोत्तम मजबूत भागीदार आहोत.

# ही आचारसंहिता माझ्यासाठी आहे का?

**होय.** ही आचारसंहिता आपल्या सर्व कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी, फ्रीलान्सर्स, संचालक, आणि मंडळातील सर्व सदस्यांना लागू आहे. यासाठी पद आणि त्यांची भूमिका आपण आपल्या सर्वोत्तम अर्थाने ही आचारसंहिता अमलात आणायची आहे आणि त्याचे पालन करायचे आहे.

ही आचारसंहिता आपल्या कंपनीने नियंत्रित केलेल्या इतर उप कंपन्यांसाठी आणि लागू आहे ज्यामध्ये आपल्या कंपनीचे हितसंबंध आहेत किंवा जिथे कंपनीकडून कामाचे व्यवस्थापन केले जाते त्यासाठी लागू आहे.


ही आचारसंहिता व त्याची मूल्ये आपल्या सर्व व्यावसायिक भागीदारांना (कंत्राटदार, समुपदेशक, एजंटस, पुरवठादार, ग्राहक, वितरण आणि इतर) लागू आहे. ते आपल्या कंत्राटी व्यावसायिक हितसंबंधांमध्ये गणले जातात.

व्यावसायिक भागीदार जे आपल्या कंपनीकडून काम करतात किंवा कंपनीच्या नावावर काम करतात अशा सर्वांना ही आचारसंहिता लागू आहे.

आम्ही आमची आचार संहिता, धोरणे, मार्गदर्शक तत्वे किंवा सूचनांचे उल्लंघन कोणत्याही स्वरूपात स्वीकार करत नाही. आणि याचा परिणाम म्हणून दंडात्मक कारवाई केली जाईल किंवा सेवा समाप्ती केली जाऊ शकते. तसेच, आमचा व्यवसाय नियंत्रित करणाऱ्या कोणत्याही कायद्याचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्तीसाठी आणि सेम्परिटसाठी गंभीर परिणाम होऊ शकतात आणि यासंदर्भात सर्वांनी सतर्क रहावे - आणि त्याचा परिणाम म्हणून गुन्हेगारी किंवा नियामक खटला देखील होऊ शकतो.

जर तुम्हाला आचार संहितेचे अथवा आमच्या धोरणांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास ही समस्या नोंदवा!

## एक कर्मचारी म्हणून माझ्याकडून काय अपेक्षित आहे?




# याव्यतिरिक्त, एक नेता म्हणून माझ्याकडून काय अपेक्षा आहेत?

प्रामाणिकपणाचे वैयक्तिक उदाहरण व्हा, केवळ शब्दांद्वारे नव्हे तर, सर्वात महत्वाचे म्हणजे, कृतींद्वारे.

तुमच्या टीमला हे समजल्याचे खात्री करून घ्या की, व्यवसायाचे फळ हे केवळ नैतिक वर्तनाने आणि आचारसंहितेचे पालन करून साध्य करता येईल.

वार्षिक टार्गेटमध्ये कर्मचाऱ्यांच्या सचोट योगदानाचा विचार करा.

सेम्परिटची पारदर्शकता आणि सचोटीची संस्कृती निर्माण करण्यात तुमची महत्वाची भूमिका आहे. तुमच्या टीमसोबत आचारसंहिता विषयांवर खुली चर्चा आणि चिंतनासाठी वेळ काढा.



एक मोकळे वातावरण तयार करा ज्यामध्ये प्रत्येक कर्मचाऱ्याला सुरक्षित वाटेल आणि जशास तसे भीतीशिवाय बोलता येईल.

तक्रार न करणाऱ्याच्या बाबतीत त्वरित कारवाई करा.

प्रत्येक संधीचे प्रामाणिकपणा आणि दृढनिश्चयाने पालन करण्याच्या आमच्या संस्कृतीचा ध्यास आहे.

ऐका, विचार करा आणि प्रतिक्रिया द्या. कोणत्याही प्रश्नांची किंवा समस्यांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला समर्थन हवे असल्यास, संबंधित युनिट्सवर अवलंबून रहा आणि अनुपालन विभागाशी संपर्क साधा.

# जर तुम्ही आमचे व्यावसायिक भागीदार असाल

सेम्पेरिट बिझनेस-टू-बिझनेस सेगमेंटमध्ये कार्य करते. आमच्या ग्राहकांची अपेक्षा आहे की, आम्ही त्यांना यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली गुणवत्ता आणि कार्यक्षमता प्रदान करू.

त्यामुळे आमचा व्यवसाय भागीदार या नात्याने, आम्ही ज्या उच्च नैतिक मानकांचे आणि तत्वांचे आम्ही पालन करतो त्याच उच्च नैतिक मानकांचे पालन आमच्या व्यवसाय भागीदारांनी करावे अशी आमची अपेक्षा आहे.

आम्ही गुणवत्ता आणि नैतिक मानकांवर आधारित आमचे व्यावसायिक भागीदार निवडतो आणि केवळ अग्रमानांकित व्यावसायिक भागीदारांसोबतच काम करतो. आम्ही करार संपुष्टात आणण्याचा आमचा अधिकार राखून ठेवतो आणि जर तुम्ही जेथे लागू असेल त्यावेळी, या आचारसंहितेचे पूर्णपणे पालन केले नाही तर नुकसानभरपाई मिळवू शकतो.

आमचे पुरवठादार आणि इतर व्यावसायिक भागीदारांना विनंती केली जाते की, विशेषत: जेव्हा ते आमच्या वतीने काम करत असतील किंवा आमच्या नावाने काम करत असतील त्यावेळी त्यांनी या आचारसंहितेचे पालन करावे. .



# तुम्ही मार्गदर्शनासाठी कुठे जाऊ शकता (सेम्पेरिटची तक्रार यंत्रणा)?

## योग्य गोष्ट करा

तुम्हाला कोणत्याही वेळी आपल्या आचारसंहितेचे किंवा इतर धोरणांचे उल्लंघन झाल्यास किंवा त्याचा संशय आल्यास कृपया त्वरित प्रतिक्रिया नोंदवा. येथे समजणे महत्त्वाचे आहे की तुम्ही एकटे नाहीत. कंपनीत होत असणाऱ्या कोणत्याही अनुचित कृतीला चांगल्या उद्देशाने आम्हाला कळविणाऱ्या घटकांना नेहमी मदत करण्यास सेम्पेरिट मदतीची खात्री देते, जेणेकरून आपण सतत विकास करू आणि उन्नत होऊ.

समजा तुम्हाला संभाव्य गैरवर्तन किंवा व्यवसायाबद्दल कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार कळला. या परिस्थितीत, शक्य असेल तर सर्वात प्रथम तुम्ही तुमच्या लाईन व्यवस्थापक, एच आर किंवा विधी प्रभागामध्ये संपर्क करू शकता. जर तुम्हाला समस्या अत्यंत क्लिष्ट वाटल्यास, तुम्ही सेम्परलाईन व्हिसलब्लोइंग हॉटलाइन वापरू शकता.

सल्ला, माहिती किंवा हस्तक्षेपासाठी, कृपया संपर्क साधा:

**आमच्या संस्थेतील व्यवस्थापक आणि वरिष्ठ नेतृत्व**
आपल्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापक आणि वरिष्ठ नेतृत्व नेहमी उपलब्ध असतात कारण ते आमच्या संस्थेतील व्यावसायिक कृतींना लागू होणाऱ्या कंपनीच्या आमच्या मार्गदर्शक तत्त्वांशी पूर्णपणे परिचित असतात.

**मानव संसाधन विभाग**
आमची मूल्ये, रोजगार धोरणे, फायदे आणि कामाच्या ठिकाणी समस्यांबद्दल (छळ, गुंडगिरी, भेदभाव इ.) प्रश्नांचे स्पष्टीकरण आणि उत्तरे देऊ शकतात.).

**अनुपालन विभाग**
हा विभाग आपल्याला आचार संहितेचे स्पष्टीकरण आणि व्याख्या स्पष्ट करण्यात मदत करू शकतो. तसेच, हे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कायदे आणि नियमांचे पालन करून सेम्पेरिटकडून व्यवसाय चालविण्याबाबत मार्गदर्शन प्रदान करेल. हे तुम्हाला पाठिंबा देईल आणि स्पर्धा, कायदा, भ्रष्टाचार, फसवणूक, दहशतवादासाठी वित्तपुरवठा आणि मनी लॉंड्रिंग, हितसंबंधांचे संघर्ष, गोपनीयता आणि वैयक्तिक डेटा संरक्षण आणि कंपनी किंवा आमच्या व्यावसायिक भागीदारांमधील अनैतिक वर्तनाशी संबंधित कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देईल.

**आरोग्य, पर्यावरण आणि गुणवत्ता विभाग (एचएसई-क्यू)**
तुम्हाला आरोग्य, पर्यावरण आणि गुणवत्ता, ऊर्जा धोरण समजवण्यास मदत करतील.

**शाश्वतता विभाग**
आमचे शाश्वतता धोरण आणि गव्हर्नन्स ध्येय: संसाधनांचे व्यवस्थापन आणि आरोग्य आणि सुरक्षितता, पर्यावरण, ऊर्जा आणि गुणवत्ता यांचे पालन कसे करावे याबद्दल मार्गदर्शन आवश्यक असेल तेव्हा तुम्हाला पाठिंबा असेल.

> सेम्पेरिट येथे, प्रत्येकाने मुक्त व निर्भयपणे व्यक्त होण्यासाठी आम्ही पाठिंबा देतो. ज्यावेळी तुम्ही समस्या आणि प्रश्न नियमित मार्गाने आम्हाला कळवू शकत नाही त्यावेळी आम्ही तुम्हाला सेम्परलाईन हे सुरक्षित आणि गोपनीय माध्यम प्रदान करतो.



## बोला!

**सेम्परबॉक्स — आम्हाला पत्र पाठवा**
तुमच्या प्रोडक्शन साइटवर असणाऱ्या सेम्परबॉक्सचा तुम्ही उपयोग करू शकतात. आम्ही तुमची विनंती या अत्यंत काळजीपूर्वक आणि गोपनीय पद्धतीने हाताळू, जर तुम्ही विनंती केली तर निनावीपणे आम्ही ही विनंती हाताळू.

**सेम्परलाईन– सुरक्षित व्हिसलब्लोईंग हॉटलाईन**
जर तुम्हाला आमच्या नियमित माध्यमातून कोणत्याही स्वरूपाची चुकीची कृती, कोणतीही समस्या किंवा कोणताही प्रश्न मांडायचा नसेल, तर तुम्ही सेम्परलाईनवर माहिती नोंदवू शकता.

तुम्ही कोणतीही चुकीची कृती, घटना किंवा तुमच्या सोबत किंवा इतरांसोबत होणाऱ्या हिंसेला कळविण्यासाठी कोणत्याही वेळी सेम्परलाईन वापरू शकतात. "सेम्परलाईन" हे वापरण्यासाठी अत्यंत सोपे, सुरक्षित आणि गोपनीय माध्यम आहे. हे आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना आणि त्यासोबतच बाह्य व्यवसाय भागीदारांना कोणत्याही वेळी उपलब्ध आहे. जर तुम्हाला निनावी पद्धतीने समस्या नोंदवायची आहे, आणि तुम्ही तुमची माहिती जाहीर करण्याचा विकल्प निवडलेला असेल, तरी तुम्ही दिलेली सर्व माहिती अहवाल काटेकोरपणे गोपनीय ठेवला जाईल.

जर तुम्हाला कोणत्याही कर्मचाऱ्यांचा छळ, गुंडगिरी, भेदभाव, गैरव्यवहार, भ्रष्टाचार, फसवणूक, संसाधने नासाडी, अयोग्य वर्तन, चुकीची कृती किंवा अव्यवस्थापन याबद्दल माहिती असल्यास, किंवा इतरांना माहिती असल्यास, आमच्याशी संपर्क साधा!

**अधिक तपशीलांसाठी, कृपया वाचा:**
व्हिसलब्लोइंग माहिती
तुम्ही अहवाल सबमिट करता तेव्हा काय होते?



# व्यवसायाची अखंडता आणि अनुपालन

Bव्यवसायाची अखंडता आणि अनुपालन हे आमच्या शाश्वतता धोरणाचे मुख्य घटक आहेत. आमची संस्थात्मक अखंडता वैश्विक पद्धतीने लागू होते. आमचा व्यवसाय चालवताना आम्ही सर्वोच्च स्तरावरील सचोटीसाठी प्रयत्न करतो.

नैतिकता आणि अनुपालन ही केवळ औपचारिकता किंवा केवळ जोखीम व्यवस्थापन कृती नाही. तर आम्ही चांगला व्यवसाय करून आणि ग्राहक, कर्मचारी, विक्रेते, भागधारक आणि इतर भागधारकांकडून विश्वासार्हता आणि विश्वास मिळविण्याची संधी म्हणून आम्ही याकडे पाहतो.

आमच्या कॉर्पोरेट मूल्यांवर आधारित, व्यवसाय अखंडता आणि अनुपालन तत्त्वांवर आधारित ही आचारसंहिता काही मार्गदर्शक तत्वे आणि अपरिहार्य मूलभूत नियम निर्माण करते, आणि एक सेम्पेरिटचा कर्मचारी म्हणून, हे धोरण स्वतः अमलात आणणे आणि आपल्या सहकारी भागीदारांना पालन करण्यास लावणे अनिवार्य आहे.
या आचार संहितेतील सर्व माहिती जाणून घेण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे, आणि जी माध्यमे आपल्याला प्रदान करण्यात आली आहे त्याचा वापर करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे, आणि, यासंदर्भात कोणत्याही उचित व्यावसायिक वर्तना संदर्भात कोणतेही मार्गदर्शन हवे असल्यास विचारा.
योग्य प्रशिक्षण हा आमच्या अनुपालन प्रणालीचा मुख्य घटक आहे. अखंडता आणि अनुपालन-संबंधित चौकशी, समस्या व्यक्त करणे किंवा उल्लंघनाची तक्रार करणे यासंबंधी तुम्ही अनुपालन विभागाशी संपर्क करण्यास कोणताही संकोच करणार नाही.

बेकायदेशीर किंवा अनैतिक वर्तन ओळखणे आणि प्रतिबंधित करतांना, कंपनी आणि आमच्या सहकाऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी एक संपूर्ण अतिरिक्त अनुपालन प्रणाली निर्माण आणि लागू केली गेली आहे. आमची अनुपालन प्रणाली तीन स्तंभांवर आधारित आहे. आपण शब्दांकडून कृतीकडे आणि कृतीतून बदलाकडे जातो. अनुपालन पारदर्शकता आणते आणि आम्हाला चांगले निर्णय घेण्यास सक्षम करते.

## व्यवसायाची अखंडता आणि अनुपालनाचे तीन स्तंभ

**प्रतिबंध**
प्रतिबंधाची आपल्या व्यवसाय विभागापासून सुरुवात होते, जेथे सर्वांना एखाद्या नुकसान संदर्भात माहिती घेणे आणि त्याला टाळण्यासाठी व जोखीम ओळखण्यासाठी आणि त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रतिबंध करणे शिकविले जाते. धोरण, नियम व अटी लागू करण्याचे दायित्व व्यवसायावर असते.

**ओळख**
जोखीम मूल्यांकन, ऑडिट, अहवाल अंतर्गत आणि बाह्य भागीदारांची थेट संपर्क याद्वारे अनुपालन विभाग आव्हाने ओळखतात. जर या आचार संहिते संदर्भात किंवा कोणतेही धोरण, मार्गदर्शक तत्व, सूचना, कायदे व अटींचे उल्लंघन झाले तर, समस्या आपल्या पर्यवेक्षकाला किंवा अनुपालन समूह विभागाला (compliance@semperitgroup.com) आणि/किंवा सेम्परलाईनद्वारे कळवणे ही आपली जबाबदारी आहे.

**शमन**
ओळखून आलेल्या सर्व मुक्त समस्यांच्या पार्श्वभूमीवर, अनुपालन विभाग या समस्यांना कमी करण्यासाठी काही कृती सुचवते आणि यासंदर्भात समूह, त्यांचे कर्मचारी, ग्राहक आणि इतर भागीदार यांना असणाऱ्या भविष्यकालीन जोखीमा टाळण्यासाठी काही उपाय सुचवते.

**अधिक तपशीलांसाठी, कृपया वाचा:**
अखंडता, अनुपालन व्यवस्थापन

### सहा गट-व्यापी अनुपालन तत्त्वे



देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन

प्रतिशोधाची भीती न बाळगता बोलण्याची संस्कृती वाढविणे

निष्पक्ष स्पर्धेला प्रोत्साहन देणे

नैतिक, पर्यावरणीय आणि सामाजिक हितसंबंधांचा आदर करणे

भ्रष्टाचारमुक्त व इतर कोणत्याही गुन्हेगारी मुक्त व्यवसायासाठी समर्पित

मानवी हक्कांचे रक्षण करणेs

## फेअर प्ले

सचोटी आमची कृती ठरवते. सेम्पेरिट  हे जगभरातील त्यांच्या व्यवसायाला लागू असणाऱ्या सर्व कायदे आणि नियमांना आणि त्यासोबतच सर्व योग्य नैतिक नियमांचे वर्गीकरण करून त्यांचे पालन करते. काही राष्ट्रीय कायदे इतरांपेक्षा कठोर असल्याने, ही आचारसंहिता नेहमी कमी कठोर नियमांपेक्षा अधिक कठोर नियमांना प्राधान्य घेते.

सेम्पेरिटमध्ये काम करतांना कंपनीत आणि आमच्या व्यावसायिक भागीदारांसोबतचे नैतिक वर्तन सेम्परिटसाठी अत्यंत समर्पक आणि महत्वाचे आहे. आमच्याकडे असलेली अनुपालन यंत्रणा आम्हाला या आचारसंहितेचा विरोध करणाऱ्या कोणत्याही कृती ओळखण्यास आणि सुधारात्मक उपाययोजना करण्यास सक्षम करेल.

व्यवसाय करार आणि व्यवहार करतांना आमच्या व्यवसाय भागीदारांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्यांबद्दल त्यांना स्पष्टपणे आणि व्यवहाराच्या दस्तऐवजाचा खुलासा करून पारदर्शकपणे केले पाहिजेत. सेम्पेरिट त्याचे एजंट, पुरवठादार आणि ग्राहकांशी आपले व्यावसायिक संबंध निष्पक्षपणे चालवते आणि लागू कायदे आणि नियमांचे पालन करते.

**चांगले निर्णय कोणाचेही नुकसान न करता व्यवसायाच्या गरजा पूर्ण करतात. हे आमचे सर्व कर्मचारी, व्यवसाय भागीदार, भागधारक आणि सर्व समुदायांना लागू होते.**

सर्व व्यावसायिक व्यवहार आणि संबंधित कृती सचोटीने आणि सर्वोच्च नैतिक मानकांसह केले जातील..

> निष्पक्षता म्हणजे भेदभाव व अप्रामाणिकपणा न करता न्याय करण्याची क्षमता.


## मानवी हक्क

अपवादात्मक परिस्थिती वगळता, सेम्परिट बालकामगार आणि सक्तीच्या कामगार श्रमाला विरोध करते आणि न्याय्य वेतन, संमेलनाचे स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी आम्ही सदैव उभे आहोत. आम्ही भेदभाव, छळ किंवा कॉर्पोरेट तत्वांचे उल्लंघन कोणत्याही स्थितीत स्वीकृत करत नाहीत तथापि ते कोणत्याही मूल्य शृंखलेत असले तरीही त्याचा परिणाम होत नाही. माहिती, प्रशिक्षण आणि सुधारात्मक कृती हे सुनिश्चित करतात की, सर्व ठिकाणी सर्वोच्च सामाजिक मानकांचे पालन केले जाईल आणि मानवी हक्कांचा आदर आणि संरक्षण हे नेहमीच आमच्यासाठी सर्वोच्च प्राधान्याचे असेल. सेम्पेरिट ग्रुपची तत्वे आणि मार्गदर्शक तत्वे केवळ आमच्या कर्मचाऱ्यांनाच लागू होत नाहीत तर ते पुरवठादार आणि इतर व्यावसायिक भागीदारांनाही लागू होतात. आणि हे आमच्या लोक आणि पुरवठादार धोरणाचाच भाग आहेत, जे सेम्परिट वेबसाइटवर सार्वजनिकपणे उपलब्ध आहेत. आणि हे धोरण आमच्यासोबत व्यावसायिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी आणि चालू ठेवण्यासाठी एक पूर्वअट आहेत. सर्व व्यावसायिक कृती आणि मानवी हक्कांवरील युएन (संयुक्त राष्ट्रसंघ) मार्गदर्शक तत्वे आणि आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (आयएलओ) मुख्य कामगार मानकांनुसार तसेच स्थानिक कायद्यांचे कठोर पालन करून आयोजित केले पाहिजेत.

## योग्य निर्णय घ्या!

**अधिक तपशीलांसाठी, कृपया वाचा:**
लोक धोरण
पुरवठादार धोरण

### सेम्पेरिट तत्वे




कर्मचाऱ्यांशी होणारा **भेदभाव** खपवून घेतला जात नाही. सेम्परिट समान संधी प्रदान करते.



जास्तीत जास्त स्वीकार्य **कामाच्या तासांबाबत स्थानिक कायदे** पाळले जातात.



कर्मचाऱ्यांना **लेखी रोजगार करार** आणि त्यानुसार दस्तऐवजीकरण केलेल्या रोजगार संबंधांच्या आधारे नियुक्त केले जाते कायद्याने..



स्थानिक बाजार परिस्थिती लक्षात घेता योग्य आणि **वाजवी मोबदला** मिळावा याची काळजी घेतली जाते..



**बालमजुरी** आणि मानवाचे इतर प्रकारचे **शोषण** खपवून घेतले जात नाही..



कर्मचाऱ्यांचे हक्क मत आणि अ**भिव्यक्तीच्या मुक्त निर्मितीचा आदर** केला जातो..

# सामाजिक आणि कामगार मानके

सेम्परिट मानवी हक्कांचे संरक्षण आणि सर्वोच्च सामाजिक मानकांचे पालन करण्यासाठी सदैव कटिबद्ध आहेत. हे आमच्या कॉर्पोरेट संस्कृतीचा मूळ गाभा असून विद्यमान कर्मचारी कायम ठेवून आणि नवीन कर्मचाऱ्यांना सामावून घेतांना एक महत्वाचा घटक दर्शवते.
आम्ही आमच्या व्यावसायिक कृतींना नियंत्रित करणारे स्थानिक कायदे आणि नियमांचे काटेकोरपणे पालन करतो.

**बालकामगार आणि लहान कामगार**
आम्ही बालमजुरी किंवा लोकांचे इतर कोणतेही शोषण स्वीकारत नाहीत व सहन करत नाहीत. कर्मचाऱ्यांचे रोजगारासाठीचे किमान वय हे राष्ट्रीय किमान वय किंवा अनिवार्य शिक्षण पूर्ण करण्याचे वय यापैकी जे जास्त असेल त्या तरतुदीचे पालन आम्ही करतो (युएन कन्व्हेन्शन ऑन द राईट्स ऑफ द चाइल्ड, ILO कन्व्हेन्शन क्र. 138, 182 आणि 79, आयएलओ शिफारस क्र. . 146).

**अनैच्छिक श्रम आणि मानवी तस्करी प्रतिबंध**
आम्ही कोणत्याही प्रकारचा बेकायदेशीर, अपमानास्पद किंवा सक्तीचा आणि बंधनकारक कामगार किंवा मानवी तस्करीचा वापर स्वीकारत नाही (आयएलओ अधिवेशन क्र. 29 आणि 105).

**सामाजिक संवाद - सहवास, संवाद आणि सहनिर्धाराचे स्वातंत्र्य**
आम्ही सामूहिक सौदेबाजी आणि सहवासाच्या स्वातंत्र्याचे समर्थन करतो. अशा प्रकारे, कामगार आणि कर्मचाऱ्यांना, भेदभाव न करता, त्यांच्या आवडीच्या ट्रेड युनियन(ने) बनविण्याचा, त्यात सामील होण्याचा आणि संघटित करण्याचा आणि त्यांच्या वतीने त्यांच्या मालकाशी एकत्रितपणे सौदा करण्याचा अधिकार असेल (आयएलओ अधिवेशन क्र. 87, 98, 135 आणि १५४).
सेम्परिट सर्व नियामक आवश्यकतांचे पालन करते जे कर्मचाऱ्यांच्या हिताचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यांच्या मतांचा आदर करतात. s.

**वाजवी वेतन आणि सामूहिक करार (पे-स्केल करार)**
सेम्पेरिट आपल्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी बाजाराच्या अनुषंगाने त्यांना मिळणारा मोबदला सुनिश्चित करते. दिलेली मजुरी ही संबंधित वातावरणाला अनुकूल आणि तुलनात्मकदृष्ट्या पारंपारिक मोबदल्यावर आधारित आहे. यामध्ये काही ठिकाणी पे-स्केल/सामूहिक करारनामा लागू करणे समाविष्ट आहे.

**भेदभाव**
सेम्पेरिट कोणत्याही प्रकारचा भेदभाव स्वीकारत नाही.

**छळ आणि गैरवर्तन**
प्रत्येक कर्मचाऱ्याला आदर आणि सन्मानाने वागवले जाईल.

**कामाचे तास**
आम्ही खात्री करतो की, जास्तीत जास्त मान्य असलेल्या कामाच्या तासांसंबंधीचे स्थानिक कायदे पाळले जातात (आयएलओ कन्व्हेन्शन क्र. 1 आणि 14).

**मत आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य**
आम्ही आमच्या कर्मचाऱ्यांचे मत आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य कोणत्याही टप्प्यावर पाळतो.

**पुरवठादार**
सेम्पेरिट पुरवठादारांद्वारे उच्च श्रम आणि सामाजिक मानकांच्या निरीक्षणास सक्रियपणे समर्थन देते. आमची तत्त्वे सेम्पेरिट ग्रुपच्या पुरवठादार धोरणामध्ये स्पष्ट केली आहेत.

अधिक तपशीलांसाठी, कृपया वाचा:
आधुनिक गुलामगिरी कायदा सेम्परिट स्टेटमेंट सेम्परिट ग्रुपचे पुरवठादार धोरण
लोक धोरण शाश्वतता धोरणे



## भेदभाव न करणे

सेम्पेरिट येथे, आम्ही रोजगारामध्ये समान संधी प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहोत. याचा अर्थ असा की आम्ही आमचे सहकारी आणि अर्जदार यांच्याशी न्याय्यपणे वागतो आणि कधीही कोणत्याही प्रकारचा बेकायदेशीर भेदभाव करत नाही.

आम्ही सर्व संबंधित कायद्यांचे पालन करतो (आयएलओ अधिवेशन क्र. 100 आणि 111, युएन कन्व्हेन्शन ऑन डिस्क्रिमिनेशन अगेन्स्ट महिला). आम्ही आमच्या रोजगार निर्णयांमध्ये (जसे की भरती, नियुक्ती, प्रशिक्षण, पगार आणि पदोन्नती) सदर मानकांचा समावेश करतो. आम्ही वंश, रंग, लिंग, वय, राष्ट्रीय मूळ, धर्म, लैंगिक अभिमुखता, लिंग ओळख किंवा अभिव्यक्ती, वैवाहिक स्थिती, नागरिकत्व, युनियन सदस्यत्व, राजकीय संलग्नता, अपंगत्व, अनुभव स्थिती किंवा कायदेशीररित्या संरक्षित घटक अश्या इतर कोणत्याही आधारावर भेदभाव करत नाही.

## छळ आणि गुंडगिरी

आम्ही अपमानास्पद वर्तनापासून मुक्त असलेल्या वातावरणात एकत्र काम करण्यासाठी समर्पित आहोत. सेम्पेरिट कोणत्याही स्वरूपात - शाब्दिक, शारीरिक किंवा दृश्य अशा छळ आणि गुंडगिरीला प्रतिबंधित करते.

## मादक पदार्थ आणि दारू



मादक पदार्थांच्या गैरवापरावर आमची भूमिका सोपी आहे: आमच्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि सुरक्षिततेशी ते विसंगत असल्याने आम्ही त्यास परवानगी देत नाही.

आमच्या आवारात अल्कोहोलच्या सेवनावर बंदी घालण्यात आली आहे, कारण यामुळे कंपनी कामगिरी खालावणे किंवा अयोग्य वर्तन होऊ शकते व इतरांची सुरक्षितता धोक्यात येते किंवा कायद्याचे उल्लंघन होते. आमच्या कार्यालयात किंवा कंपनीच्या कोणत्याही कार्यक्रमात बेकायदेशीर मादक पदार्थ सक्तीने प्रतिबंधित आहेत. जर एखाद्या पर्यवेक्षकाला किंवा व्यवस्थापकाला असा विश्वास असेल की कर्मचारी कामाच्या दरम्यान ड्रग्स आणि/किंवा अल्कोहोलच्या प्रभावाखाली आहे, तर तो अल्कोहोल आणि/किंवा ड्रग स्क्रीनिंगची विनंती करू शकतो. आणि ही वाजवी शंका कर्मचाऱ्याचे स्वरूप, वागणूक किंवा बोलणे यासारख्या वस्तुनिष्ठ लक्षणांवर आधारित असू शकते.

## जागतिक विविधता आणि समावेश

सेम्पेरिट हे जागतिक आणि स्थानिक अशा दोन्ही व्यवसायांचे उत्तम मिश्रण आहे. अशा प्रकारे विविधता आणि समावेशन हे आपल्या संस्कृतीच्या केंद्रस्थानी आहेत आणि सेम्पेरिटच्या यशाचा ते एक आवश्यक भाग आहेत. आमच्यासाठी, नुसते एक विविधता असणारे मनुष्यबळ आणि सर्वसमावेशक कार्यस्थळ तयार करणे हीच केवळ योग्य गोष्ट नाही तर त्यापेक्षाही अधिक असे एक धोरणात्मक व्यवसाय प्राधान्य आहे जी अधिक सर्जनशीलता आणि नवकल्पना वाढवते. आम्ही विविधतेतून आमची ताकद मिळवतो आणि आम्ही सर्व पैलूंमध्ये समावेशाची संस्कृती वाढवण्यासाठी समर्पित आहोत: ज्यामध्ये लिंग, राष्ट्रीयत्व, धर्म, वय, लैंगिक अभिमुखता आणि शिक्षण आहे.

### आम्ही ऐकण्यासाठी येथे आहोत

जर तुम्हाला कंपनीमध्ये कोणाकडूनही किंवा आमच्या व्यवसाय भागीदाराकडून भेदभावाची भावना, छळ करणे किंवा त्रास दिल्याचा अनुभव आल्यास, अशा घटने संदर्भात त्वरित तक्रार देणे आवश्यक आहे. याबरोबरच, जर पर्यवेक्षक आणि व्यवस्थापकांना अशा घटना माहिती असल्यास त्यांनी त्वरित कळवा.

### आम्ही मदत करू!

Sतुमच्या पर्यवेक्षकाला, लाईन मॅनेजर किंवा तुमच्या एचआर ग्रुपला आणि/ किंवा अनुपालन विभाग यांना(compliance@semperitgroup.com) कळवा. तुम्ही तुम्हाला आलेल्या भेदभावाचा किंवा खेळाचा अनुभव <u>सेम्परबॉक्स</u> पोस्ट बॉक्स किंवा <u>सेम्परलाईनला</u> कळवा. जर तुम्हाला तुमचे नाव जाहीर करायचे नसल्यास निनावीपणे तुम्ही हे करू शकता.

आमच्या चौकशी प्रक्रियेनंतर, अशा प्रकारच्या घटनेचा त्वरित, जबाबदारीने आणि संपूर्णपणे तपास केला जाईल.



## भ्रष्टाचार प्रतिबंध

आम्ही जे व्यावसायिक भागीदार योग्य अनुपालन नियम पाळतात, फक्त त्यांच्यासोबत व्यवसाय करतो. या विषयाची खात्री करण्यासाठी, आमच्याकडे सुस्पष्ट अशी व्यवसाय भागीदार परीक्षण प्रक्रिया आहे, जी आम्हाला आमच्या व्यावसायिक नातेसंबंधांना परिभाषित करण्यासाठी प्राथमिक स्तरावर उपयोगी ठरते. प्रत्येक कर्मचारी जे व्यवसाय भागीदारासाठी जबाबदार आहेत त्यांनी व्यवसाय भागीदार परीक्षण प्रक्रिया सुरुवात केली पाहिजे आणि त्यानुसार अंतर्गत नियम आणि अटी वापरून परीक्षण केले पाहिजे.




आम्हाला माहित आहे की, भ्रष्टाचार, खाजगी फायद्यासाठी आपल्याकडे असलेल्या अधिकारांचा जाणीवपूर्वक दुरुपयोग केला तर, व्यवसायाला हानी पोहोचते, किंवा बाजारपेठेत समस्या येऊ शकते आणि विशेषतः आमच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवू शकते. म्हणूनच आम्ही आमच्या उत्पादनांच्या आणि सेवांच्या गुणवत्तेवर आधारित ग्राहक आणि व्यवसाय वाढविण्यासाठी वचनबद्ध आहोत आणि आम्ही हे कधीही लाचखोरी किंवा इतर कोणत्याही बेकायदेशीर कृतींमधून साध्य करत नाही.

**तुमचा निर्णय किंवा निर्णयक्षमतेवर प्रभाव होईल त्यासाठी कधीही विनंती करू नका, वचन देऊ नका, देऊ नका किंवा स्वीकारू नका.**

प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष ऑफर, पेमेंट, मागणी करणे किंवा कोणत्याही स्वरूपात लाच स्वीकारणे प्रतिबंधित आहे.

कोणत्याही प्रकारचा व्यावसायिक लाभ मिळविण्यासाठी लाच म्हणून अर्थ लावण्यात येणारे कोणतेही पेमेंट (रोख किंवा अन्यथा) देणे, देऊ करणे किंवा व्यक्ती, संस्था यांचेकडून स्वीकारले जाणार नाहीत.
एखाद्या व्यक्तीला प्रभावित करण्यासाठी सुविधा देयके देखील लाच आहेत आणि ती दिली जाऊ नयेत.

**सार्वजनिक अधिकारी**
सार्वजनिक अधिकाऱ्यांसह तसेच सरकारी मालकीच्या उद्योगांवर विशेष खबरदारी आवश्यक आहे. लाच म्हणून अर्थ लावता येईल अशा कोणत्याही कृती, भेटवस्तू किंवा त्यासंदर्भातील कोणत्याही कृतीला आम्ही अनुमती देणार नाही. सार्वजनिक अधिकाऱ्यांशी व्यवहार करताना विशेष लक्ष देणे आवश्यक आहे, कारण किरकोळ फायदा देखील लाच किंवा निर्णय प्रक्रियेत पुरावा म्हणून समजला जाऊ शकतो. अंतर्गत नियम आणि स्थानिक कायद्याचे निरीक्षण करा. सरकारी अधिकाऱ्यांना एकटे भेटू नका.

**राजकीय योगदान, देणग्या आणि प्रायोजकत्व**
सेमपेरिट राजकीय पक्ष, संस्था किंवा वैयक्तिक राजकारण्यांना (प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे) योगदान देत नाही.
सेम्पेरिट सामाजिकरित्या सहभागी कंपनी असल्याने, टिकाऊ प्रकल्पांमध्ये योगदान देते आणि अत्याधुनिक टिकाऊपणा प्रक्रिया विकसित करते. आम्ही कॉर्पोरेट प्रायोजकत्व प्रदान करण्यात आणि धर्मादाय देणग्या देण्यात पारदर्शक आहोत. परंतु या देणग्या कायदेशीर मर्यादेत येणे आवश्यक आहे. .

देणग्या आणि प्रायोजकत्वांना सेम्पेरिटमध्ये अंतर्गत मान्यता आवश्यक आहे. ते केवळ लेखी कराराच्या आधारावर आणि कर कपातीची हमी देणाऱ्या फॉर्ममध्ये मंजूर केले जाऊ शकतात. प्राप्तकर्त्यांची प्रतिष्ठा आणि उद्दिष्टे आमच्या मूल्ये आणि या आचारसंहितेशी सुसंगत असणे आवश्यक आहे.

**तृतीय-पक्ष देयके**

तृतीय-पक्ष एजंट, सल्लागार, वितरक किंवा सेम्पेरिटट (एकत्रितपणे, "तृतीय पक्ष") साठी किंवा त्याच्या वतीने कार्य करणारे इतर कोणतेही तृतीय-पक्ष प्रतिनिधींना त्याच्या वतीने बेकायदेशीर/अनुचित पेमेंट करण्यास मनाई आहे. सेम्पेरिटच्या वतीने काम करण्यासाठी तृतीय पक्षांद्वारे नियुक्त केलेल्या उपकंत्राटदारांना देखील हे प्रतिबंध लागू होतात.

**भेटवस्तू, आदरातिथ्य आणि कार्यक्रम**
भेटवस्तू, आदरातिथ्य किंवा कार्यक्रमांचे आमंत्रण स्वीकारण्याची समज (फायदे म्हणून संदर्भित) ही समानुपातिकता, पारदर्शकता, मूल्य आणि वारंवारता यासारख्या घटकांमुळे प्रभावित होते.

सेम्पेरिटने भेटवस्तू, आदरातिथ्य आणि इव्हेंट मार्गदर्शकतत्त्वात नमूद केल्यानुसार लाभ स्वीकारणे/अनुदान देणे आणि दिलेले किंवा मिळालेले लाभ रेकॉर्ड करणे यासंबंधी नियम स्पष्ट केले आहेत.
फायदे हे योग्य, प्रथेनुसार आणि उच्च आदराचे लक्षण म्हणून मानले जातील.

कोणताही फायदा आमच्या वागणुकीवर किंवा निर्णयावर प्रभाव टाकण्यासाठी दिला जात असेल तर तो नाकारण्यासाठी आम्ही सर्वांना पाठबळ देतो. प्रतिपक्षाचे वर्तन किंवा निर्णय बदलण्याच्या उद्देशाने असे फायदे देणे प्रतिबंधित आहेत.

रोख किंवा रोख रक्कमेच्या स्वरुपात इतर लाभ ऑफर करणे किंवा स्वीकारणे कठोरपणे प्रतिबंधित आहे..

**अधिक तपशीलांसाठी, कृपया वाचा:**
भ्रष्टाचारविरोधी मार्गदर्शक तत्वे
आदरातिथ्य आणि कार्यक्रम मार्गदर्शक तत्वे
सेम्परिट बिझनेस पार्टनर चेक गाइडलाइन

# स्वारस्यांचा संघर्ष

आम्ही एकनिष्ठ आहोत आणि कंपनीच्या फायद्यासाठी आम्ही नेहमीच कार्य करतो. अशा प्रकारे, व्यावसायिक निर्णयांवर खाजगी स्वारस्य किंवा नातेसंबंधांचा प्रभाव नसावा. जेव्हा तुमचे खाजगी हितसंबंध सेम्पेरिटच्या सर्वोत्तम हितासाठी कार्य करण्याच्या तुमच्या जबाबदारीशी संघर्ष करतो तेव्हा स्वारस्यांचा संघर्ष उद्‌भवतो. 'वैयक्तिक स्वारस्ये' हा शब्द खाजगी पुरती मर्यादित असू शकतो किंवा तुमच्या कुटुंबाच्या, मित्रांच्या किंवा तुम्ही ज्यांच्याशी निगडीत आहात अशा इतर संस्थांच्या हितसंबंधांतून देखील हा संघर्ष उद्‌भवू शकतो.

कर्मचारी किंवा कर्मचाऱ्याच्या निकटवर्तीय कुटुंबातील सदस्याचे सेम्पेरिटच्या, ग्राहक, पुरवठादार, कर्मचारी (सध्याचे किंवा संभाव्य) किंवा अन्य कोणत्याही प्रतिस्पर्ध्यांशी कोणतेही व्यावसायिक, आर्थिक किंवा इतर संबंध नसावेत जे सेम्परिटसाठी असलेल्या कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या आणि त्यांच्या कार्यक्षमतेत बिघाड करू शकतात.

स्वारस्य विरोधाभासी, व्यक्तीआधारित असू शकतात (आपण परस्परविरोधी स्वारस्याने प्रभावित असल्याचे दिसून येऊ शकते), संभाव्य (आपण परस्परविरोधी स्वारस्यांमध्ये असू शकता) किंवा वास्तविक (आपण परस्परविरोधी स्वारस्यांमध्ये आहात) असू शकतात.

स्वारस्याच्या संघर्षाची परिस्थिती ओळखणे नेहमीच सोपे नसते. प्रतिबंध आणि योग्य व्यवस्थापन केल्यास अशी परिस्थिती नियंत्रणात ठेवता येते. सर्व प्रकारच्या हितसंबंधांचे निराकरण योग्य पद्धतीने करणे आवश्यक आहे. संघर्ष योग्यरित्या कमी करण्यासाठी आपण कृती करतांना योग्यरित्या प्रत्येक प्रक्रिया चरणांचे दस्तऐवजीकरण करणे आवश्यक आहे.

### Wहितसंबंधातील संघर्ष टाळणे किंवा व्यवस्थापित करणे का आवश्यक आहे?

• सेम्पेरिटच्या प्रतिष्ठेचे नुकसान होऊ शकते.

•तुम्ही हितसंबंधांच्या संघर्षाची परिस्थिती योग्यरित्या व्यवस्थापित केल्यास, तुम्ही सेम्पेरिटचा व्यवसाय तुमच्या खाजगी हितसंबंधांच्या आधी ठेवता.

•आपण या परिस्थितीचे व्यवस्थापन न केल्यास, जबाबदारी, अखंडत्व आणि पारदर्शकता धोक्यात येते.


### तुम्ही हितसंबंधांच्या संघर्षाची परिस्थिती कशी ओळखू शकता?

•तुम्हाला सेम्परिटचे ध्येय, उद्देश आणि मूल्ये समजून घेणे आवश्यक आहे.

•तुमची वैयक्तिक स्वारस्ये जर काही असतील तर तुम्हाला ते सेम्पेरिटच्या स्वारस्याच्या विरोधात आहे किंवा नाही याचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे.

### प्रतिक्रिया कशी द्यावी?

- पारदर्शक व्हा आणि सचोटीने आणि परिश्रमाने वागा.
- खाजगी स्वार्थासाठी किंवा फायद्यासाठी तुमच्या पदाचा गैरवापर करू नका.
- सेम्परिट माहितीचा गैरवापर करू नका किंवा कंपनीबाहेर शेअर करू नका.
- कोणत्याही प्रकारची धारणा, संभाव्य किंवा वास्तवात असलेल्या स्वारस्य संघर्षाच्या स्थिती असतील तर त्या आपल्या पर्यवेक्षकासोबत लागू असलेल्या अंतर्गत नियमांतर्गत कळवा.



### 1. वैयक्तिक संबंध

मित्र, कुटुंबातील सदस्य किंवा एखादा व्यक्ती ज्यांचे तुम्ही पर्यवेक्षण करतात आणि ज्यांच्याशी तुमचे प्रेमसंबंध सुद्धा आहेत.

### 2. आर्थिक हितसंबंध

व्यवसाय करणाऱ्या अशा कंपनीत गुंतवणूक करणे जी सेम्पेरिट स्पर्धा करते.

### 3. व्यवसायाच्या संधी

सेम्पेरिट मधील तुम्ही शिकलेल्या कामातून तुम्ही संधीचा फायदा घेतला किंवा आमच्या कंपनीशी स्पर्धा करणारा एखादा व्यवसाय सुरू केला. आपल्या एखाद्याकौटुंबिक सदस्याला संभाव्य व्यवसाय भागीदार म्हणून आमंत्रित करणे आणि कंपनीच्या निर्णयावर प्रभाव टाकणे.

असा व्यवसाय करणे.

### 4. कुटुंबातील सदस्य

तुमच्या कुटुंबातील सदस्याला तुमच्या पदाचा वापर करून अनुचित लाभ मिळवून देण्यास अनुमती देणे. तुमच्या कुटुंबातील व्यक्तीला तुमच्या अधिकारात थेट नियुक्त करणे भरतीला पाठिंबा देणे.

# संघर्ष कमी करण्यासाठी चार स्टेप्स

**स्टेप-1**
स्वारस्य संघर्ष स्थिती पाहणे आणि ओळखणे

**स्टेप-2**
स्वारस्य संघर्ष स्थिती असलेला सदस्य आपल्या पर्यवेक्षकाला माहिती देतो. आवश्यकतेनुसार अनुपालन विभाग विभागाला सूचना करा.

**स्टेप-3**
पर्यवेक्षक यावर उपाय सांगून, सदर स्थिती अनुपालन विभागास कळवेल.

**स्टेप-4**
पर्यवेक्षक स्वारस्य संघर्ष असलेल्या व्यक्तीला लिखित स्वरूपामध्ये परिणाम कळवेल. पर्यवेक्षक अनुपालन विभागाकडून आलेल्या दस्तावेजाला सादर करेल.

# मनी लॉड्रिंग प्रतिबंध

मनी लॉड्रिंग ही एक बेकायदेशीर प्रक्रिया आहे जी गुन्हेगार त्यांच्या उत्पन्नाचे अवैध स्त्रोत लपवण्यासाठी वापरतात. त्यांच्या बेकायदेशीर कृत्यांमुळे मोठ्या प्रमाणात पैसा निर्माण होतो ज्याचे स्पष्टीकरण किंवा लपविले जाऊ शकत नाही. जर त्यांना पैसे वापरायचे असतील आणि पकडले जाणे टाळायचे असेल तर त्यांनी ते कायदेशीर केले पाहिजे. म्हणून ते "घाणेरडे" पैसे स्वच्छ आणि कायदेशीर करण्यासाठी "श्वेत" करतात. आणि ते सर्वांना कायदेशीर स्त्रोताकडून आल्यासारखे दिसण्यासाठी ते जटिल तंत्रे, हस्तांतरण आणि असंख्य व्यवसायांद्वारे व्यवहार करत असतात. रोख, ट्रॅव्हलरचे चेक, मनी ऑर्डर किंवा तृतीय-पक्षाच्या खात्यांमधून पेमेंट यांसह, आम्ही किंवा आमच्या प्रकल्पांचा वापर पैश्यांना श्वेत करण्यासाठी करत नाहीत आणि याची आम्ही खात्री केली पाहिजे. आमची सर्व देयके कर कायदे आणि अँटी-मनी लॉन्डरिंग आणि भ्रष्टाचार विरोधी नियमांचे पालन करतात. आम्ही फक्त पुरवठा केलेल्या आणि रीतसर नोंदणी केलेल्या वस्तू आणि सेवांसाठीच पैसे हस्तांतरित करतो ज्यांची ओळख व स्त्रोत आम्हाला माहीत आहे. ज्या सामान्य आणि कायदेशीर व्यक्तींना आहेत त्यांनाच आम्ही नवीन व्यावसायिक संबंधांच्या बाबतीत आम्ही काम करण्यापूर्वी त्यांची व्यवसाय भागीदाराची पार्श्वभूमी तपासतो.

सेम्पेरिटचे कर्मचारी म्हणून, आम्ही कधीही:

- कोणत्याही व्यवहाराचा किंवा व्यवसाय संबंधाचा भाग नसल्याच्या घटकाला देय देत नाहीत किंवा स्वीकारत नाहीत;
- रोखीने पेमेंट स्वीकारणे;
- न जोडलेल्या पक्षांसोबत सौद्यांमध्ये भाग घेणे किंवा व्यवहार करणे;
- असामान्य पेमेंट पद्धती वापरणे;
- आमचा व्यवसाय चालवण्यासाठी असामान्य किंवा अत्यंत अटी व शर्ती असलेल्या नियमांचा स्वीकार करणे;
- सेम्पेरिटच्या मानक प्रक्रियेशी विसंगत अशा प्रकारे ग्राहक ऑर्डर पाठवणे;
- कायदेशीर आणि व्यावसायिक कारणाशिवाय कंपन्या किंवा व्यक्तींना पेमेंट करणे;
- गुन्हेगार किंवा संशयितांशी व्यवहार करणे;
- संबंधित खोटे कागदपत्रे बनविणे किंवा नष्ट करणे.

## मनी लॉन्ड्रिंगच्या प्रयत्नांची उदाहरणे


1. खाते उघडण्यासाठी ग्राहकाकडून खोटी माहिती देण्याचा प्रयत्न.
2. परताव्याच्या विनंत्यांनंतर रोखीने किंवा जादा पेमेंट करण्याची ऑफर.
3. ग्राहकाच्या व्यापार किंवा व्यवसायाशी असामान्य किंवा विसंगत ऑर्डर, खरेदी किंवा पेमेंट करणे.
4. असामान्यपणे क्लिष्ट असलेली डील संरचना अस्तित्वात आणणे.
5. व्यवहाराशी संबंधित नसलेल्या देशांना किंवा त्यांच्याकडून अवास्तव निधी हस्तांतरण करवून घेणे.
6. रेकॉर्डिंग किंवा रिपोर्टिंग टाळून केलेले व्यवहार.
7. रोख समतुल्य वापरून असामान्यपणे मोठी देयके करणे- जसे उधार (उदा. कॅशियरचे चेक आणि मनी ऑर्डर).
8. उत्पादने खरेदी करून आणि नंतर खरेदी रद्द करणे.

p अशी कोणतीही परिस्थिती अनुपालन आणि विधी विभागांना कळवा.

**अधिक माहितीसाठी:**
सेम्पेरिट व्यवसाय भागीदार परीक्षण मार्गदर्शक तत्वे

## मनी लॉड्रिंग चक्र

मनी लॉड्रिंग मध्ये काही वेळा तीन टप्पे नसू शकतात किंवा काही टप्पे संयुक्तिक असू शकतात किंवा हे टप्पे अनेक वेळा घडू शकतात.



# अंतर्गत नियम


या माहितीमध्ये काही माहिती कॅपिटल मार्केट कायद्याप्रमाणे" अंतर्गत माहिती" म्हणून समजली जाते: अंतर्गत माहिती ही एक अशी माहिती असते त्यामध्ये एका किंवा एकापेक्षा जास्त कंपनी किंवा त्यांच्या आर्थिक व्यवहारांविषयी माहितीचा अंतर्भाव त्यामध्ये असतो, जी सामान्यपणे सार्वजनिक नसते, जर अशी माहिती सार्वजनिक रित्या सामायिक केली तर त्या कंपनीचे मूल्य कमी होते. सेम्पेरिट कंपनीची आर्थिक ट्रेडिंग इन्स्ट्रुमेंट (उदाहरणार्थ शेअर्स किंवा बॉण्ड) किंवा इतर कंपनीची माहिती त्यामध्ये ट्रेड करण्याविषयी शिफारस असते आणि आपल्या कंपनीची माहिती जी सामायिक करण्यास निश्चित आहे त्याचा समावेश होतो. आणि अशा गोष्टींमुळे, जर एखादा कर्मचारी यामध्ये सहभागी असेल तर. सेम्पेरिट समूहाच्या नियमांचे गंभीर उल्लंघन होते. कॅपिटल मार्केट अनुपालनासाठी सेम्पेरिट समूहाने विशिष्ट मार्गदर्शक तत्वे अमलात आणली आहेत.

**उदाहरण: अंतर्गत टिपिंग म्हणजे काय?**
अमान्य असलेल्या व्यक्तिला अंतर्गत माहिती देणे ज्यामध्ये कुटुंबीय, मित्र किंवा तृतीय पक्षांचा समावेश होतो; आणि अशा व्यक्तींना या माहितीचा उपयोग गुंतवणूक करण्यासाठी होतो किंवा जे अंतर्गत ट्रेडिंग शी संबंधित आहे. कोणतीही माहिती सार्वजनिक नसेल आणि अशा माहितीचा उपयोग चुकीच्या पद्धतीने लाभ मिळवण्यासाठी एखाद्या व्यक्तीने केला तर अशा पद्धतीचे टिफिन हे बेकायदेशीर मानले जाते आणि त्यामुळे इतर गुंतवणूकदारांच्या हितांना हानी पोहोचते.


### अंतर्गत माहिती



संभाव्य व्यावसाईक डील्स, किंवा मार्केट



सेम्पेरिट मधील व्यवस्थापनातील आगामी बदल




अशी माहिती जी उघड केल्याने मार्केटवर परिणाम होऊ शकतो.



संभाव्य नवी उत्पादने

**अधिक माहितीकरिता, कृपया वाचा:**
अंतर्गत अनुपालन
सेम्परलाईन

## अविश्वास आणि स्पर्धा कायदा

आम्ही ज्या देशात काम करतो त्या देशाचे अविश्वास आणि स्पर्धा कायदे यांचे अनुपालन करतो
समायोजित बनावट वर्तन, अनौपचारिक बैठका किंवा अनौपचारिक " सभ्य करार", ज्याद्वारे स्पर्धेवर नियंत्रण मिळवले जाते किंवा स्पर्धेला लक्ष केले जाते, किंवा स्पर्धा प्रतिबंधित करण्यात येते. अशा प्रकारच्या कृतींना टाळले पाहिजे. आमच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने आमच्या स्पर्धाकाशी अशा कोणत्याही संवादामध्ये(ज्यामध्ये लिखित, इलेक्ट्रॉनिक किंवा मौखिक संदेशांचा समावेश होतो) भाग घेणे टाळले पाहिजे, जे स्पर्धक प्रयत्न करतात:

- मान्यता देणे, निर्धारित करणे, दर स्थिर किंवा नियंत्रित करणे,क्रेडिट अटी, सूट किंवा वजावट (किंवा इतर किंमत घटक);
- संवेदनशील व्यावसायिक माहिती सामायिक करणे;
- कंत्राट, ग्राहक किंवा प्रदेश निर्धारित करणे;
- काही ग्राहक किंवा पुरवठादारांना प्रतिबंधित करणे; किंवा
- कोणत्याही उत्पादनाला किंवा सेवा आराखड्याला मर्यादित करणे.

आम्हाला याची जाणीव आहे की आम्ही ज्या प्रदेशामध्ये काम करतो तेथील स्पर्धेसाठी असलेले सर्व कायदे आम्ही पाळतो आणि सेम्पेरिटच्या व्यवसायिक प्रतिष्ठेला जपताना आम्ही कोणत्याही स्पर्धेसाठी असलेल्या कायद्याचे उल्लंघन करत नाही जेणेकरून अनुपालन कायद्याचा भंग होईल. आम्ही आमचे पुरवठादार आणि ग्राहक यांना त्यांच्या व्यावसायिक घडामोडींसाठी कधीही प्रतिबंध करत नाही. मार्केटमध्ये काम करत असताना कोणत्याही प्रकारच्या गैर लागू असलेल्या व्यावसायिक नीती आम्ही वापरत नाही, याची आम्ही खात्री करतो.

**स्पर्धात्मक उपयुक्त माहिती गोळा करणे**
स्पर्धेच्या वातावरणात टिकून राहण्यासाठी, आम्हाला काही उपयुक्त माहिती गोळा करावी लागते, जी आमच्या व्यवसायाचा एक नैसर्गिक व आवश्यक भाग आहे. आम्ही अशा प्रकारची माहिती जबाबदारीने आणि कायदेशीररित्या मिळवतो..

अशा प्रकारची माहिती योग्य पद्धतीने सार्वजनिक स्त्रोतांकडून मिळविण्यासाठी परवानगी आहे:

- ट्रेड शो मध्ये जाहीर केलेली माहिती;
- पुरवठादार माहिती
- विपणन माहितीपत्रके;
- वर्तमानपत्रे आणि इतर मास मिडिया;
- विश्लेषण अहवाल;
- ट्रेड प्रकाशने;
- वेबसाईट आणि प्रेस रिलीज.

**अधिक माहितीकरिता, कृपया वाचा:**
अविश्वास धोरण
सेम्पर;लाईन

# निर्यात नियंत्रण आणि मान्यता

Eज्या व्यावसायिक भागीदाराशी आम्ही व्यवसाय करतो त्या ठिकाणी निर्यात नियंत्रण आणि आर्थिक मान्यता नियम कार्यान्वित होतात. राष्ट्रीय सीमारेषेबाहेर विक्री, निर्यात किंवा व्यापारी जिन्नस बाहेर पाठवण्यासाठी किंवा बाहेर सेवा प्रदान करण्यासाठी नियंत्रण करण्यासाठी काही नियमक मंडळ असतात त्यासाठी काही विशिष्ट कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे यामध्ये कॅपिटल मुमेंट आणि पेमेंटचा समावेश होतो. निर्यात नियंत्रण आणि मान्यता या एखाद्या देशाला, व्यापारी जिन्नस वर किंवा व्यक्तिगत रित्या लागू असतो.

आपल्याला निर्यात नियंत्रण कायदे आणि मान्यता आणि त्यांचे संभाव्य परिणाम माहीत असणे आवश्यक आहे.




आपल्याला हे माहिती असायला हवे की कोणत्या तरतुदीनुसार आपल्या व्यवसायावर बंदी किंवा मर्यादा लागू होईल किंवा त्यासाठी आपल्याला मोठ्या प्रमाणावर दंड आकारला जाईल. आपण याची खात्री केली पाहिजे की आपण ज्या व्यावसायिक भागीदाराबरोबर काम करत आहोत त्यांच्यावर कोणतीही बंधने किंवा दंडात्मक कारवाई नको.
आपल्या व्यवसायाच्या कायदेशीर वैधतेची खात्री करण्यासाठी, आपल्या तृतीयपक्षीय भागीदारांसाठी एक कृती प्रक्रिया आहे: सेम्पेरिट व्यवसाय भागीदार परीक्षण. हा आपला व्यक्तिगत आणि सेम्पेरिटचा महत्त्वपूर्ण स्वारस्य विषय आहे की, व्यावसायिक नातेसंबंधातून कोणत्याही प्रकारची जोखीम उद्भवल्यास त्यावर उपाय म्हणून करण्याची कृती या संदर्भात आपल्याला माहिती पाहिजे.


**अधिक माहितीकरिता, कृपया वाचा:**
आंतरराष्ट्रीय व्यापार निर्बंधांची तत्त्वे
व्यवसाय भागीदार परीक्षण तत्त्वे
Sसेम्पेरिट व्यवसाय भागीदार परीक्षण मार्गदर्शक तत्त्वे

## फसवणूक


आम्ही जाहीर करतो की, सेम्पेरिट येथे काम करीत असताना कोणत्याही प्रकारची फसवणूक सहन केली जाणार नाही. फसवणूक ही सहेतुक, अयोग्य किंवा बेकायदेशीर, विश्वास भंग करणारी बाब आहे ज्यामध्ये हेतूपुरस्परपणे फसवणे, आर्थिक किंवा राजकीय लाभासाठी फसवणे यांचा समावेश होतो.

लक्षात घ्या- ज्यावेळी पेमेंट अदा करण्याची वेळ येते, त्यावेळी एक दिवस थांबून सर्व दस्तावेज योग्य पद्धतीने खात्री करून त्यानंतरच पेमेंट करणे आवश्यक आहे, म्हणजे पेमेंट इतर कोणत्याही खात्यात जाणार नाही. विनंती करण्यात आलेला व्यवहार खरोखरपणे वैध आहे किंवा नाही याची दोन वेळा खात्री करा. कोणतेही संशयास्पद पेमेंट अदा न करण्यासाठी कार्यकारी मंडळाचे संपूर्ण समर्थन आम्ही करतो.

**जर तुम्हाला कोणतीही फसवणूक आढळली तर, कृपया बोला!**
तुमच्या पर्यवेक्षकाकडे किंवा internal.controls@semperitgroup.com वर किंवा (जर आर्थिक फसवणूक असेल तर) ग्रुपट्रेजरी किंवा Vienna@semperitgroup.com वर- किंवा सेम्परलाईन व्हिसलब्लोईंग हॉटलाईनवर तक्रार करा. जर संशय असेल तर, आमच्या अंतर्गत अनुपालन साइटवर असलेल्या प्रक्रियेचे पालन करा.



प्रत्येक वेळी पेमेंट देताना डोळ्यांचे तत्व पालन करा- कोणतेही पेमेंट फक्त एका व्यक्तीकडून मंजूर केल्या जाणार नाही..



काटेकोरपणे कोणतेही सेक्युरिटी डिवाइस इतरांना देऊ नका(जसे इलेक्ट्रॉनिक टोकन, डोंगल इत्यादी)

### फसवणुकीचे प्रकार

**बाहय फसवणूक**
- न केलेले किंवा अपूर्ण केलेल्या कामासाठीचे पेमेंट
- हॅकर्स, फिशिंग, सामाजिक अभियांत्रिकी;
- सेम्पेरिटचे अधिकारी असल्याचे सांगून पेमेंटची मागणी करणे (सीईओ फसवणूक);
- बनावट पेमेंट सूचना फसवणूक.

**अंतर्गत फसवणूक**
व्यावसायिक फसवणूक
lजेव्हा तुम्ही सेम्परिटच्या संसाधनाचा किंवा मालमत्तेचा वैयक्तिक समृद्धीसाठी जाणूनबुजून गैरवापर किंवा गैरवर्तन करता:
- कंपनीच्या मालाचा गैरवापर;
- घोटाळा (एखाद्याच्या ट्रस्टमध्ये ठेवलेल्या किंवा नियोक्त्याच्या मालकीच्या).

फसव्या बिलिंग
- जर एखाद्या कर्मचाऱ्याने खोट्या पावत्या, दावे किंवा काल्पनिक देयके सादर केली;
- पुरवठादार जाणूनबुजून जादा शुल्क आकारत असल्यास आम्ही जागरूक असणे आवश्यक आहे,बदल्यात निकृष्ट वस्तू आणि सेवांचा पर्याय देत असल्यास.

खरेदी फसवणूक
- जेव्हा आम्ही वस्तू किंवा सेवा खरेदी करतो आणि प्रक्रियेत सामील असलेल्या आमच्या कर्मचाऱ्याचे छुपे स्वारस्य असते.

**कॉर्पोरेट मालमत्तेचे संरक्षण**
अंतर्गत धोरणांसह आमची मालमत्ता आणि संसाधने जबाबदारीने वापरली पाहिजेत.

**अधिक माहितीकरिता, कृपया वाचा:**
फसवणूक शोधणे आणि अहवाल देणे
अधिकारीच्या मर्यादा
पेमेंट सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे

# अंतर्गत नियंत्रण नियम

**अचूक बुककीपिंग**
आम्ही आमच्या व्यवसाय आणि आर्थिक परिस्थितीचे अचूक प्रतिबिंबित करणारी पुस्तके आणि रेकॉर्ड ठेवतो. व्यवहारांची प्रामाणिकपणे नोंद करण्याची आणि आमच्या नोंदी काळजीपूर्वक हाताळण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

**फोर-आय तत्व**
सेम्परिटमध्ये व्यवहार आणि व्यवहार रेकॉर्डिंगची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी फोर-आय तत्व महत्वपूर्ण आहे. हे तत्व आम्ही सेम्परिटच्या वतीने अंमलात आणलेल्या सर्व व्यवसाय प्रक्रिया आणि कृतींमध्ये, अंतर्गत आणि बाह्यरित्या लागू करतो याची खात्री करणे ही आमची जबाबदारी आहे. किमान दोन प्रतिनिधींनी सर्व दस्तऐवजांवर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे ज्याचा प्रभाव कोणत्याही सेम्परिट ग्रुप घटकावर बंधनकारक आहे.

**अधिकाऱ्याच्या मर्यादा**
आम्ही अधिकाऱ्याच्या मर्यादा (एलओएएस) मध्ये नमूद केलेले नियम लागू करतो आणि त्यांचे पालन करतो.

सेम्परिट ग्रुपच्या कोणत्याही कायदेशीर घटकामध्ये किंवा त्याच्या वतीने विशिष्ट व्यावसायिक निर्णय घेताना एलओएए वेगवेगळ्या संस्थात्मक स्तरांसाठी अधिकृतता मर्यादा परिभाषित करतात.

एलओएएस अंतर्गत अधिकृततेचा प्रश्न समाविष्ट करतात.

एलओएएस सेम्परिट ग्रुपच्या कोणत्याही कायदेशीर घटकाच्या अंतर्गत किंवा वतीने सर्व व्यावसायिक निर्णयांना लागू होतात. एलओएएस सेम्परिटच्या सर्व कर्मचाऱ्यांना आणि सेम्परिटच्या अंतर्गत किंवा त्याच्या वतीने व्यावसायिक निर्णय घेण्याची जबाबदारी सोपवलेल्या इतर कोणत्याही व्यक्तींना लागू होतात.

एलओएएस संस्था-विशिष्ट व्यवस्थापन नियमांमध्ये अंतर्भूत केले जातील.

**व्यवस्थापनाचे नियम (आरओएमएस)**
सेम्परिट ग्रुपच्या प्रत्येक घटकाच्या प्रत्येक महाव्यवस्थापकाने हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की व्यवस्थापनाचे विशिष्ट नियम (संबंधित गट मार्गदर्शक तत्वांचे अनुसरण करून) बाह्य प्रतिनिधित्व निर्दिष्ट करून (उदा. करारावर स्वाक्षरी करून) आहेत.

**अंतर्गत नियंत्रण प्रणाली (आयसीएस)**
प्रत्येक सेम्परिट घटकावर आयसीएस लागू केला जातो, त्याच्या विभाग, प्रदेश किंवा आकारापेक्षा स्वतंत्र. परिणामी, संबंधित अंतर्गत नियंत्रणांचे पालन करणे आवश्यक आहे, सर्व प्रक्रियांसाठी आणि सर्व कर्मचाऱ्यांनी, कोणत्याही नोकरीच्या श्रेणींपासून स्वतंत्र. अंतर्गत नियंत्रणे सर्वांनाच चिंतित करतात. सामान्य निरीक्षण, विशेषत: अंतर्गत नियंत्रणांची प्रभावीता सुनिश्चित करण्यासाठी, अंतर्गत लेखापरीक्षणाच्या देखरेखीखाली आहे.


तथापि, कोणत्याही अंतर्गत नियम आणि नियमांच्या उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी प्रत्येकाने कोणत्याही संप्रेषण चॅनेलचा वापर करणे आवश्यक आहे.

तुमच्या पर्यवेक्षकांना कळवा आणि internal.controls@semperitgroup.com वर कळवा. तुम्ही पत्र पोस्ट करण्यासाठी SemperBox किंवा ऑनलाइन तक्रार करण्यासाठी SemperLine चा वापर करू शकता (लेखित अहवाल किंवा टेलिफोन कॉल), किंवा तुम्ही (+43 1 79777240) कॉल करू शकता किंवा अनुपालन विभागाला ईमेल लिहू शकता: compliance@semperitgroup.com.

**अधिक माहितीकरिता, कृपया वाचा:**
अधिकाऱ्याच्या मर्यादा
खरेदी मार्गदर्शक तत्त्वे
अंतर्गत नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वे



## सार्वजनिक तपास




कंपनीच्या हितासाठी आणि सर्व कायद्याच्या अधीन राहून आम्ही सार्वजनिक तपासाला पाठिंबा देतो. अशा प्रकारच्या सार्वजनिक तपास चाल आणि त्याची प्रक्रिया ही आमच्या सार्वजनिक तपास मार्गदर्शन पत्रिकेमध्ये उपलब्ध आहे..

जरी आपण कंपनी सोडत असू तरीसुद्धा सेम्पेरिटची माहिती संरक्षित करण्याची जबाबदारी आपलीच आहे. अशा स्थितीमध्ये, सेम्पेरिटची माहिती आपण संरक्षित करून आणि इतर कोणासोबतही सामायिक करू नये.

**अधिक माहितीकरिता, कृपया वाचा:**
सार्वजनिक तपास मार्गदर्शक तत्व/डॉन रेड



## सायबर सुरक्षा, डेटा संरक्षण आणि संवेदनशील माहिती



सेम्पेरिटची संपूर्ण माहितीचा ही फक्त सेम्पेरिटमध्येच राहायला पाहिजे.

अशा प्रकारची कोणतीही माहिती गोपनीय समजली जाते आणि त्या माहितीचे संरक्षण केले पाहिजे. जी माहिती बाह्य जगामध्ये सार्वजनिक रित्या वितरित करायची असल्यास ती आधी मंजूर असायला हवी. सेम्पेरिट येथे काम करत असताना आपण सेम्पेरिटची माहिती आणि आपल्या सर्व कर्मचारी, ग्राहक आणि भागीदार यांची गोपनीय आणि व्यक्तिगत माहिती संरक्षित करण्यासाठी आपण जबाबदार आहोत. प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असणारी कर्मचारी, ग्राहक आणि भागीदार यांची माहिती आवश्यकतेपुरती सामायिक करणे मान्य आहे. कोणत्याही प्रकारची माहिती काटेकोरपणे गोपनीय ठेवावी आणि हाताळावी.

बाजार गुपिते आणि काही विशिष्ट माहिती जी जाहीर केली असता आपली कंपनी. कर्मचारी. तृतीय पक्ष आणि ग्राहक यांना नुकसान होईल अशी सर्व माहिती त्याला अतिरिक्त संरक्षण हवे जसे एन्क्रिप्शन. आयटी विभाग आपल्याला आपल्या माहितीचे संरक्षण आणि गोपनीयता वाढवण्यासाठी योग्य ते एन्क्रिप्शन साधने आणि प्रमाण उपलब्ध करून देतील. आम्ही सर्व IT कॉर्पोरेट गुणवत्ता मार्गदर्शक तत्त्वे, डेटा संरक्षण, तांत्रिक आणि संस्था उपाय आणि सायबर सुरक्षा धोरणे, मार्गदर्शक तत्त्वे आणि सूचनांबद्दल जागरूक आहोत आणि त्यांचा आदर करतो.

सेम्परिट वैयक्तिक डेटा आणि गोपनीयतेचे संरक्षण करते. आम्ही डेटा संरक्षण नियमन आणि कायद्यांचे पालन करून सर्व वैयक्तिक डेटा आणि माहिती हाताळतो. विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांनुसार आमच्या डिव्हाइसवर संग्रहित केलेली आमची सर्व खाजगी माहिती म्हणून चिन्हांकित करणे ही आमची जबाबदारी आहे. तुम्ही data.privacy@semperit-group.com आणि cybersecurity@semperitgroup.com वर डेटा उल्लंघनाची तक्रार करू शकता..

**अधिक माहितीकरिता, कृपया वाचा:**
माहिती संरक्षण मार्गदर्शक तत्त्वे
अंतिम वापरकर्ता मार्गदर्शक तत्त्वे
मोबाईल डिव्हाईस मार्गदर्शक तत्त्वे
दस्तावेजांचे वर्गीकरण

# शाश्वतता


**आम्ही लोक आणि पर्यावरणाची जबाबदारी घेतो**

आपल्या समाजांतील घटकांना सध्या अनेक मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागतो - सर्वप्रथम आणि महत्त्वाचे म्हणजे, हवामान बदल आणि त्याचे धोके आणि परिणाम. आपल्या पर्यावरणसाखळी हा हवामान बदलाशी जवळचा संबंध असलेला दुसरा-सर्वात महत्त्वाचा विषय आहे; कच्च्या मालाची निवड, संसाधनांचा वापर आणि पुनर्प्राप्ती यासारख्या विषयांच्या श्रेणीशी संबंधित आहे. परंतु ज्या प्रश्नांना आपल्याला सोडवायचे आहे ते प्रश्न केवळ पर्यावरणीय मापदंडांशी संबंधित नाहीत. ते हवामानातील बदल आणि जगभरातील संसाधनांचा वाढता वापर या दोन्हींमुळे होणाऱ्या सामाजिक परिणामांची समस्या निर्माण करतात.

पर्यावरणाशी संबंधित आव्हाने आणि पर्यावरणीय कायदे आणि नियमांचे पालन करण्यापलीकडेसुद्धा सेम्परिट या सर्व सामाजिक आव्हानांकडे लक्ष देते, ज्यामध्ये सतत वाढणारी असमानता आणि लोकसंख्याशास्त्रीय बदलांचे परिणाम समाविष्ट आहेत आणि सकारात्मक योगदान देण्याच्या उद्देशाने उद्देशपूर्ण कृती सुरू करतात. शाश्वततेमध्ये यश मिळवण्यासाठी सर्वांगीण विचार करणे, जागरूकता विकसित करणे (सर्व संबंधित भागधारकांसह) आणि कोणताही विषय मागे पडणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. आमचे क्रियाकलाप आणि उपाय, तसेच आमची उत्पादने, वर्तमान आणि भविष्यातील पिढ्यांसाठी संधी निर्माण करण्यासाठी सेवा देतात.

**अधिक माहितीकरिता, कृपया वाचा:**
शाश्वतता

## सेम्पेरिटची ईएसजी मार्गदर्शक तत्त्वे



# आरोग्य, सुरक्षा आणि गुणवत्ता

एक वैश्विक कंपनी म्हणून, सेम्पेरिट आपल्या शाश्वत आर्थिक विकासाचे पालन करते. आम्ही प्रत्येक व्यक्तीसोबत, समाजासोबत आणि पर्यावरणासोबत जागरूक आणि आदराचे वर्तन करतो ज्यामध्ये आमच्या कंपनीची मूल्ये, कल्पना आणि तत्वे यांचा समावेश होतो. आम्ही प्रत्येक समाज घटकांसोबत जबाबदारीने वागतो.

सेम्पेरिट आपल्या पर्यावरण संरक्षणाच्या जबाबदारीला चांगल्या पद्धतीने जाणतो आणि सर्व पर्यावरणाचे कायदे पालन करतो. हे आमच्या प्रक्रिया आणि उत्पादनांना सुद्धा लागू आहे. आम्ही योग्य व्यवस्थापन आणि उन्नत तंत्रज्ञानाच्या उपयोगाने प्रदूषण कमी करून, आमच्या कार्यस्थळावर सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण प्रदान करू, यासोबतच पर्यावरणाचे रक्षण, ऊर्जा आणि नैसर्गिक स्त्रोतांचे रक्षण करू. आणि पर्यावरणावर किमान परिणाम होईल अशा पद्धतीने नियोजन करू..

प्रत्येक विभागांमध्ये आम्ही नैसर्गिक स्त्रोतांचे आर्थिक आणि योग्य नियोजन करू. आम्ही कच्चामाल आणि ऊर्जा यांचा किमान  वापर करू आणि किमान कचरा निर्माण होईल याची खात्री करू.

अधिकृत मंडळाकडून मान्य केल्यानंतरच आम्ही हवा, आणि आणि जमिनीचा वापर करू. हे आमच्या सर्व प्रक्रिया म्हणजे बांधकाम, प्रोडक्शन, प्रोडक्शन साइटवरील बदल किंवा विस्तार यासाठी सुद्धा लागू असेल. आम्ही कोणत्याही प्रकारच्या बेकायदेशीर पदार्थांच्या गळतीला टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू. (आधीची आवृत्ती: आम्ही, म्हणजे प्रत्येक बाजूने, कोणत्याही उपपदार्थांचे बेकायदेशीर गळती)

कायदेशीर पद्धतीने आम्ही कचऱ्याचे व्यवस्थापन करू व विल्हेवाट लावून. जर यासाठी आम्ही तृतीय पक्षाची मदत घेतली तर, ते सर्व पर्यावरणीय नियमांचे आणि आमच्या अंतर्गत मानांकनाचे पालन करतात याची खात्री करू.

प्रत्येक वेळी, आम्ही घातक केमिकल कचऱ्याचे आणि इतर पदार्थांच्या कचऱ्याचे योग्य काळजीपूर्वक व्यवस्थापन करू. सेम्पेरिट जेथे लागू असेल त्या ठिकाणी, म्हणजे प्रोडक्शन साईट, उत्पादनाची हाताळणी इत्यादी ठिकाणी आरईएसीएच (रजिस्ट्रेशन, ईव्हॅल्युएशन आणि ऑथरायजेशन ऑफ केमिकल्स) या उद्देशाला पाठिंबा देतो, सेम्पेरिट हा अंतिम वापर करता असल्याने, आपल्याकडे येणारे सर्व केमिकल पदार्थ हे पूर्व नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. आम्ही अत्यंत निकटतेने राष्ट्रीय आणि युरोपियन प्लॅटफॉर्म सोबत काम करतो,

Health Safety Environment Energy Quality

जे आपल्याला आरईएसीएच मध्ये असणारी मार्गदर्शक तत्वे अमलात आणण्यासाठी शिफारस करतात, ज्यामध्ये आमच्या ग्राहकाने पुरवठादार यांच्यामधील केमिकल संदर्भातील संवाद प्रस्थापित करण्याचा समावेश होतो. जर तुम्हाला याविषयी अधिक माहिती हवी असल्यास, आम्हाला reach@semperitgroup.com वर संपर्क करा

आमची पर्यावरणीय मानके आमच्या सर्व व्यवसाय भागीदारांना लागू आहेत. आम्ही अपेक्षा करतो की ही सर्व पर्यावरणीय मानके आमचे सर्व पुरवठादार आणि व्यवसाय भागीदार पाळतील आणि त्यांचे पर्यावरणीय फुटप्रिंट (ऊर्जा, ऍडमिशन आणि पाणी) यासंदर्भात जाणीव ठेवतील, आणि पर्यायाने ते सर्व कायदेशीर गोष्टींचे अनुपालन करतील.

आरोग्य आणि सुरक्षितता ही एक मूलभूत बाब आहे आणि त्याला कधीही टाळता येणार नाही. सेम्पेरिट येथे काम करत असताना आम्ही समजतो की आरोग्य आणि सुरक्षितता हे प्रत्येक यशस्वी कामासाठी एक बल आहे. आम्ही, एक कर्मचारी म्हणून, एक अमूल्य संपत्ती आहोत. आमचे कौशल्य, क्षमता, कल्पकता आणि बदलायला सदैव तयार असण्याची वृत्ती आपल्या कंपनीसाठी नवीन विकासाची संधी दर्शवते. सेम्पेरिटसाठी, आमचे सर्व कर्मचारी एका सकारात्मक वातावरणात काम करणे आवश्यक आहे जेथे ते आपले कौशल्य आणि क्षमता विकास करू शकतील. " शून्य अपघात" हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आम्ही सुरक्षेला नेहमी प्राधान्य देतो आणि आमच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी आम्ही जोखीम कमी करून अपघात कमी करतो व कर्मचाऱ्यांना आरोग्यदायी व सुरक्षित वातावरण प्रदान करतो. बाह्य जगात असणाऱ्या सर्व कंपनीप्रमाणेच सेम्पेरिट एक उत्तम आरोग्य आणि सुरक्षितता योजना प्रदान करते. यापुढे, आम्ही आमच्या सर्व कर्मचाऱ्यांना आरोग्य आणि सुरक्षितता माहिती आणि प्रशिक्षण पुरवतो ज्यामध्ये पर्सनल प्रोटेक्टिव्ह इक्विपमेंट म्हणजेच व्यक्तिगत संरक्षक साधने यांचा समावेश होतो, जे प्रत्येक कर्मचाऱ्याला पुरवण्यात येतात. आमच्या ध्येयानुसार, आमच्या कर्मचाऱ्यांना कमीत कमी व्यावसायिक इजा आणि आजारपण असावे त्यासाठी आम्ही प्रयत्न करतो.

आमचे सुरक्षा धोरण हे आमच्या कर्मचाऱ्यांच्या शारीरिक, आणि सामाजिक कार्य स्थिती सुधारण्याचे ध्येय ठेवते..

**अधिक माहितीकरिता, कृपया वाचा:**
सेम्पेरिट आरोग्य, सुरक्षा, पर्यावरण धोरण

## बाह्य संवाद

p आम्ही जबाबदारीने संवाद साधतो, आणि अशा संवादांचा आपल्या व्यवसायावर कोणता परिणाम होतो हे आम्हाला माहित आहे.

सेम्पेरिटचा एक भाग म्हणून, आम्ही कंपनीच्या वतीने सार्वजनिकरित्या जोडलेलो आहोत जेथे आपल्याला आपण कार्यालयीन दृष्ट्या अधिकृत नसताना सुद्धा किंवा असताना आपले मत प्रदर्शन करावे लागते. आपल्या श्रोत्यांना या संदर्भात कोणतेही मत नसते आणि ते सेम्पेरिटने केलेले अधिकृत विधान आणि सेम्पेरिटच्या कर्मचाऱ्यांनी केलेले विधान याचे वर्गीकरण करू शकत नाही. सार्वजनिक रित्या आपण जे बोलतो त्याचा आपली कंपनी, कर्मचारी, आपला ब्रँड आणि आपल्या स्वतःवर परिणाम होत असतो. त्यामुळेच, आपण ज्यावेळी सार्वजनिकरित्या बोलू त्यावेळी विवादात्मक विषयांवर बोलताना अत्यंत काळजीपूर्वक बोलणे अपेक्षित आहे. या संदर्भातील कोणतीही कृती, कोणतीही माहिती जाहीर करण्याआधी, आपण आपल्या ग्रुप ब्रँड व्यवस्थापन विभागासोबत संयोजन करावे.

कंपनीमध्ये असणारी सार्वजनिक माहिती बाह्य जगामध्ये जाहीर करता येते, आणि कंपनीच्या वतीने फक्त अधिकृत प्रवक्ता बोलू शकतो.



## सोशियल मिडिया

सोशियल मीडिया वापरण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकारांचा ,

सेम्पेरिट आदर करते, पण सोशियल मीडियावरील कोणतीही कृती ही कधीही पूर्णपणे खाजगी असू शकत नाही, त्यामुळे अशा प्रकारचे संवाद चॅनल्स आपण अत्यंत काळजीपूर्वक वापरायला हवे. आपल्या सर्व कृती या आपल्या कंपनीच्या मूल्यांवर आणि धोरणांवर आधारित असाव्या मग तो कोणत्याही प्रकारचाप्लॅटफॉर्म (उदाहरणार्थ लिंकडीन ट्विटर, फेसबुक) असो. एखाद्या विवादास्पद विषयावर बोलताना आपण काळजी घेतली पाहिजे जसे सोशियल मीडियावरीलधार्मिक किंवा राजकीय विषय. सोशल मीडियावर आपण अशी माहिती, पोस्ट टाळली पाहिजे ज्यामुळे आपल्या स्वतःच्या आणि/ किंवा कंपनीच्या प्रतिमेला धक्का पोहोचेल.

पण हे जाणले पाहिजे की आपल्या करारातील तरतुदीनुसार, जसे रोजगार करार आणि त्यातील गोपनीयतेचे कलम, हे आपल्या सोशियल वेबवरील सर्व घटकांना लागू होते. आपण कंपनीची अंतर्गत माहिती कोणत्याही सोशल मीडिया चॅनलवर सामायिक करू नये. या कारणासाठी, आम्ही जी माहिती सार्वजनिक स्तरावर जाहीर करण्यासाठी नाही ती माहिती सोशल मीडिया प्रोफाइल्स वर. प्रकाशित करत नाही.

आम्ही आमच्या अंतर्गत तक्रारी किंवा टीका किंवा अंतर्गत विभाग कोणत्याही स्वरूपात सार्वजनिक रित्या सुशील मीडियावर हाताळत नाहीत. याऐवजी, आम्ही अशा विवादांचे निराकरण आमच्या वरिष्ठ अधिकारी आणि/ किंवा/ आमच्या संदर्भित व्यक्तीसोबत करतो जेथे आम्ही सेम्पेरिटच्या संवाद चॅनल्स (सेम्परलाइन) चा वापर करतो.).

या व्यतिरिक्त, आम्ही सर्व गोपनीयता आणि कॉपीराईट नियमांचे पालन करतो. ज्या माहितीचे आमच्याकडे हक्क नसतात ती माहिती (माहिती, चित्र किंवा व्हिडिओ) आम्ही कधीही प्रकाशित करत नाही. सेम्पेरिटचि सामग्री (उदाहरणार्थ लोगो) वापरण्यासाठी, आपल्याला ग्रुप ब्रँड व्यवस्थापनाकडून परवानगी घ्यावी लागते. आपण कंपनीचा लोगो हा आपल्या खाजगी किंवा व्यावसायिक कारणांसाठी वापरू शकत नाही.

सर आपल्याला असे वाटत आहे की कोणताही प्रश्न, विषय किंवा सोशियल मीडिया पोस्टवर तुमचे कंपनीच्या वतीने मत आवश्यक आहे, त्यावेळी आपण कोणतेही उत्तर न देता, असा प्रश्न आपल्या ग्रुप मॅनेजमेंट व्यवस्थापनाकडे कळवावा..

आपल्याला माहित असलेल्या नियमांना पालन करण्यासाठी आपण जबाबदार आहोत, आणि त्यामुळेच आपण आपले सर्वात योग्य समज अमलात आणली पाहिजे. आपल्याला हे माहिती आहे की सोशल मीडियाच्या वापरामुळे आपल्या कर्मचाऱ्यांना त्रास होणे, भेदभाव होणे अथवा छळ होणे हे होणार नाही

**अधिक माहितीकरिता, कृपया वाचा:**
सोशियल मिडिया मार्गदर्शक तत्वे
दस्तावेजांचे वर्गीकरण

# बोला!

आमची अपेक्षा आहे की आमच्या सर्व कर्मचाऱ्यांनी आमच्या व्यवसायाचे मूल्ये, लागू असलेले सर्व कायदे, व्यावसायिक अखंडता, आचारसंहिता व अंतर्गत मार्गदर्शक तत्वे, धोरण आणि प्रक्रिया यांचे पालन करावे. जर या नियम आणि अटींचे अनुपालन आपण केले नाही तर आपण आपल्या कंपनीला आणि कर्मचाऱ्यांना, व्यावसायिक भागीदारांना हानी पोहोचवू शकतो. त्यामुळेच, अशा प्रकारच्या अनियमित गोष्टी किंवा उल्लंघन तुम्ही त्वरित सांगितल्या पाहिजेत.

व्यावसायिक भागीदार, ग्राहक आणि इतर भागीदारांकडून केलेल्या आरोपांना सेम्पेरिट महत्त्व देते.

व्हिसलब्लोइंग हा भ्रष्टाचार, फसवणूक, लाचखोरी, निधी आणि संसाधनांचा गैरवापर आणि इतर गैरप्रकार ओळखणे, शोधणे आणि प्रतिबंधित करण्याचा एक प्रभावी मार्ग आहे.

### मी कसे बोलू शकतो?

तुम्हाला कोणत्याही चुकीची तक्रार करायची असल्यास, समस्या सामाईक करायच्या असतील किंवा इतर प्रश्न असतील आणि तुम्ही संवादाचे नेहमीचे मार्ग वापरू शकत नसाल, तर तुम्ही सेम्परलाइन (आमचे सुरक्षित वेब-पोर्टल) किंवा सेम्पर-बॉक्स (पत्र पोस्ट करण्यासाठी) वापरू शकता किंवा तुम्ही आम्हाला येथे ईमेल करू शकता: compliance@semperitgroup.com.

तुम्ही किंवा इतरांच्या कोणत्याही चुकीची, घटना किंवा उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी कोणतेही चॅनेल वापरू शकता. आपल्याला वाटल्यास, आपण निनावी राहू शकता परंतु, आपण आपली ओळख उघड केली तरी, खात्री बाळगा की आपला अहवाल काटेकोरपणे गोपनीय राहील.

तुम्ही खात्री बाळगू शकता की, आम्ही तुमचे प्रकरण अत्यंत सावधगिरीने हाताळू, गोपनीयतेचे रक्षण करू आणि विनंती केल्यास, तुमचे नाव गुप्त ठेवू.

**सेम्परबॉक्स - आम्हाला एक पत्र पाठवा**

SemperBox आपल्या उत्पादन साइटवर स्थित आहे. येथे फक्त स्थानिक अनुपालन समन्वयकांना वापर करण्याची अनुमती आहे

**सेम्परलाइन - हॉटलाइन**

कोणत्याही चुकीची तक्रार करण्यासाठी तुम्ही सेम्परलाईन हे, आमचे ऑनलाइन सुरक्षित वेब पोर्टल वापरू शकता. "सेम्परलाईन" वापरण्यास सोपे, सुरक्षित आणि गोपनीय आहे. हे कर्मचाऱ्यांसाठी तसेच बाह्य पक्षांसाठी कधीही उपलब्ध आहे..

**ईमेल पाठवा किंवा आम्हाला कॉल करा**

तुम्ही आमच्या अनुपालन विभागाला कोणत्याही वेळी कॉल करू शकता किंवा आम्हाला ईमेल पाठवू शकता. तुम्ही तुमचे नाव अशा प्रकारे उघड करण्याचे ठरवू शकता. आम्ही, कोणत्याही परिस्थितीत, आपल्या समस्या किंवा अहवाल काटेकोरपणे गोपनीय राहतील आणि ते योग्यरित्या हाताळले जातील याची खात्री करू.

ईमेल: compliance@semperitgroup.com.

.

### जेव्हा आपण बोलतो तेव्हा काय होते?

अनुपालन विभाग तुमच्या प्रकरणाचे विश्लेषण करतो, अनुपालन मंडळाला या प्रकरणाची माहिती दिली जाते आणि संभाव्य मताबद्दल सल्ला देतो. हे प्रकरण कसे हाताळायचे हे अनुपालन मंडळ ठरवते आणि अंतर्गत तपास सुरू करू शकते. अंतर्गत तपास गट या गोपनीयतेला बांधील आहे आणि प्रतिशोधाविरूद्ध व्हिसलब्लोअरच्या संरक्षणास बांधील आहे.

### तपासादरम्यान गुप्तता आणि नाव गुप्त ठेवले जाते का?

जर नाव गोपनीय ठेवण्याची विनंती केल्यास, कोणतीही तपासणी गोपनीयता, व्यावसायिकता, स्वातंत्र्य, क्षमता, वस्तुनिष्ठता, निःपक्षपातीपणा, सूड घेण्यास (उदा. सेम्परलाइन किंवा सेम्परबॉक्स वापरताना), निनावीपणाचे संरक्षण या तत्वांचे पालन करते.

### आम्ही व्हिसलब्लोअर म्हणून संरक्षित आहोत का?

जो कोणत्याही प्रतिशोधाविरूद्ध चांगल्या हेतूने आम्हाला कळवितो त्या प्रत्येक व्हिसलब्लोअरचे सेम्पेरिट संरक्षण करते. तुम्हाला कोणत्याही प्रकारच्या प्रतिशोधाचा सामना करावा लागल्यास, कृपया compliance@semperitgroup.com वर त्वरित संपर्क साधा.

## तुम्ही संवाद कसा साधाल?




तुम्ही यांचेसोबत संवाद साधू शकतात:

1. तुमचे लाईन व्यवस्थापक
2. अनुपालन विभाग: compliance@semperitgroup.com
3. मानव संसाधन विभाग
4. सेम्परलाईन किंवा सेम्परबॉक्सला पोस्ट पत्र

### मी मार्गदर्शनासाठी कुठे जावे?

जर तुम्हाला कोणी धोरणे आणि नियम उल्लंघन करण्यास सांगत असेल टर कोणत्याही वेळी आम्हाला संपर्क करतांना घाबरू नका.

।जर तुम्हाला कश्या पद्धतीने विचारावे अथवा कृती करावी हे माहिती नसेल तर कृपया तुमच्या लाईन व्यवस्थापकाला किंवा अनुपालन विभाग (compliance@semperitgroup.com) ला कळवा.

**अधिक माहितीकरिता, कृपया वाचा:**
सेम्परलाईन व्हिसलब्लोईंग यंत्रणा
चुकीची कृती सेम्परलाईनला कळवा

# अधिक माहिती

**सेम्पेरिट एजी होल्डिंग**

**जनरल काउंसिल**
फ्रांझ-मायकेल होहेन्सिन
franz-michael.hohensinn@semperitgroup.com

**वरिष्ठ समूह अनुपालन व्यवस्थापक**
सिमोना एच. बोसिगर
simona.h.bosiger@semperitgroup.com

**अनुपालन विभाग**
compliance@semperitgroup.com
data.privacy@semperitgroup.com

**मुख्य माहिती सुरक्षा अधिकारी**
ख्रिश्चन पॉप
christian.popp@semperitgroup.com

**अंतर्गत नियंत्रणे (फसवणूक)**
internal.controls@semperitgroup.com

**ग्रुप ट्रेझरी (पेमेंट फसवणूक)**
GroupTreasury.Vienna@semperitgroup.com

**पत्ता**
एम बेलवेडर 10
1100 व्हियेन्ना, ऑस्ट्रिया
www.semperitgroup.com

लोकांचे सर्व संदर्भ लिंग-तटस्थ आहेत. अंतर्गत दस्तऐवजांचे संदर्भ आणि त्यांचे दुवे केवळ अंतर्गत भागधारकांसाठी उपलब्ध आहेत.

**सेम्पेरिट समूह म्हणजे सेम्पेरिट एजी होल्डिंग आणि त्याच्या सर्व पूर्ण मालकीच्या उपकंपन्या.**

© सेम्पेरिट एजी होल्डिंग

ही आचार संहिता रिको समूहासहित सेम्पेरिट समूहाकरिता लागू आहे..

SEMPERIT

rico GROUP

www.semperitgroup.com